


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३०७ ■ रविवार, दि.१७ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# घंटागाडी GPSचा लोचा, QR स्कॅनिंगचा झोल!






## दुचाकीवर क्यूआर कोड स्कॅनिंग आणि कागदावर कचरामुक्ती

## कचरा उचलण्याच्या बोगस नोंदी आणि अकोलेकरांना लागतो चुना

## घंटागाडी जीपीएस आणि क्युआर कोड स्कॅनिंग डाटा मिसमॅच..!

प्रतिनिधी १७मे

**अकोला :** केंद्र व राज्य सरकारची फसवणूक करत अकोला महापालिका रोज अकोलेकरांच्या डोळ्यात धुळ फेकत आहे. अकोलेकरांच्या घरावरचे स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत लावलेले क्यू आर कोड हे घंटागाडीचे काम करणारा ठेकेदार परस्परच दूचाकीवर फिरत स्कॅन करत आहे. इतकेच नाही तर घंटागाडीचे जीपीएस आणि स्कॅनिंगचे जीपीएस लोकेशन मॅच होत नसून या माध्यमातून अकोलेकरांची नुसतीच फसवणूक नाही तर लुट सुरु केल्या गेली आहे. घंटागाडीचा कचरा उचलणारा ठेकेदार दुचाकीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियानाचे क्यु आर कोड स्कॅन करत प्रत्यक्षात घंटागाडी पाठवित नसल्याची धक्कादायक माहिती मिळाली आहे. घंटागाडीची जीपीएस लोकेशन आणि घरा घरावर लावलेले क्यू आर कोड चे लोकेशन मॅच होत नसताना महापालिका ठेकेदाराचा लाड का करत आहे, असा प्रश्न उपस्थित होत असून कचरा घंटागाडीचा मोठा घोटाळा महापालिकेत सुरु आहे. अकोलेकरांच्या घरांच्या बाहेर लावलेल्या क्यु आर कोडचे बोगस स्कॅनिंग करुन केंद्र शासनाची महापालिकेने फसवणूक करत १५ व्या वित्त आयोगात स्वच्छतेसाठी कोट्यावधीचा निधी प्राप्त केला. १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. अकोला महापालिकेला २७ कोटींचा निधी प्राप्त झाला असून शेजारच्या अमरावती महानगरपालिकेला तब्बल ३३ कोटी, चंद्रपूर महानगरपालिकेला १६ कोटी इतका निधी मंजूर झाला आहे. मुख्यतः अकोला शहरात घंटागाड्यांचे बनावट स्कॅनिंग रॅकेट आणि घंटागाडीचे मॅच न होणारे लोकेशन पाहता केंद्र सरकारने इतका मोठा निधी दिला कसा असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. तर घंटागाडी ठेकेदाराला वाचविण्याचा उद्योग कोण करत आहे असा प्रश्न विचारला जात आहे.

### पाणीपुरवठा आणि कचरा व्यवस्थापनावर खर्च

नगर विकास विभागाने ९ एप्रिल २०२६ रोजी जारी केलेल्या शुद्धीपत्रकानुसार, प्राप्त झालेल्या या निधीचा वापर अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने करावा लागणार आहे. या बंधनकारक अनुदानाचा ५० टक्के निधी हा पेयजल पुरवठा व्यवस्थापनात सुधारणा, रेन वॉटर हार्वेस्टिंग आणि पाण्याचा पुनर्वापर यासाठी खर्च करणे बंधनकारक आहे. तर उर्वरित ५० टक्के निधी प्रभावी घनकचरा व्यवस्थापनासाठी खर्च करावा लागणार आहे.

# राज्यात पेट्रोल-डिझेलचा तुटवडा...!

**बुलडाणा, वाशिममध्ये पेट्रोल-डिझेलची भीषण टंचाई! पंपांवर 'नो स्टॉक'चे फलक, टँकर येताच नागरिकांची झुंबड**



प्रतिनिधी १७मे

**अकोला :** महाराष्ट्रातील जनतेला सध्या भीषण इंधन टंचाईचा सामना करावा लागत आहे. बुलढाणा, वाशिमसह परभणी जिल्ह्यातील बहुतांश पेट्रोल पंपांवर 'नो स्टॉक'चे फलक झळकले आहेत. ज्या काही मोजक्या पंपांवर इंधन शिल्लक आहे, तिथे नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी पाहायला मिळत आहे. तसेच अनेक पंपांवर वाहनांच्या रांगा लागल्या असून, पेट्रोल-डिझेलचा टँकर येताच नागरिकांची एकच झुंबड उडत असल्याचे दृश्य पहावयास मिळत आहे.

बुलढाणा जिल्ह्यात परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. जिल्ह्यातील एकूण १६५ पेट्रोल पंपांपैकी निम्म्याहून अधिक पंप गेल्या तीन दिवसांपासून इंधन नसल्यामुळे कुलूपबंद आहेत. सिंदखेड राजा तालुक्यातील मलकापूर पांगरा येथील पेट्रोल पंपावर काल रात्री इंधन भरण्यासाठी आलेल्या एका इसमाला काही दुचाकीस्वार गुंडांनी बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली. विशेष म्हणजे, यावेळी घटनास्थळी पोलीस कर्मचारी हजर असतानाही हा राडा झाला. तसेच वाशिम जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. डिझेल मिळवण्याच्या कारणावरुन ग्राहकांची तुंबळ हाणामारी झाल्याची घटना वाशिमच्या छाबडा पेट्रोल पंपावर घडली आहे.

### परभणीत पुन्हा 'नो स्टॉक'; अनेक पंप बंद

परभणी शहरासह संपूर्ण जिल्ह्यात पुन्हा एकदा इंधन टंचाईचे सावट गडद झाले आहे. मुख्य डेपोकडून इंधनाचा पुरवठा वेळेत न झाल्यामुळे जिल्ह्यातील अनेक पेट्रोल पंपांवर इंधन संपले आहे. त्यामुळे चालकांना 'नो स्टॉक'चे फलक पाहावे लागत आहेत. ज्या पंपांवर इंधन उपलब्ध आहे, तिथे वाहनांच्या किलोमीटर लांब रांगा लागल्या असून तासनतास ताटकळत राहावे लागत आहे. पुरवठ्यातील विस्कळीतपणामुळे परभणीतील अनेक पंप चालकांवर पंप पूर्णपणे बंद ठेवण्याची वेळ आली आहे.

# बंधाऱ्यात बुडून महिलेसह तीन चिमुकल्यांचा मृत्यू!

प्रतिनिधी १७मे

**यवतमाळ :** सिन्नर तालुक्यातील नांदूरशिंगोटे येथील नागरे वस्ती परिसरातील बंधाऱ्यात बुडून महिला आणि तीन चिमुकल्यांचा करुण मृत्यू झाल्याची घटना शनिवारी दुपारी चारच्या सुमारास घडली. यवतमाळ जिल्ह्यातून पुण्याकडे कामासाठी निघालेल्या मजूर कुटुंबावर या दुर्घटनेमुळे शोककळा पसरली आहे.

मृतांमध्ये मनीषा विजय रामजोशी (वय २८), तिचा मुलगा कार्तिक विजय राम जोशी (११), तसेच भाचे आदित्य राहुल शिंदे (७) आणि अविनाश राहुल शिंदे (८, सर्व रा. वडारपुरा, दिग्रस, जि. यवतमाळ) यांचा समावेश आहे. डिग्रस येथील हे कुटुंब पुणे येथे नाली खोदकामाच्या कामासाठी निघाले होते.

मुक्कामाच्या ठिकाणाजवळील नागरे बंधाऱ्यावर शनिवारी मनीषा रामजोशी कपडे धुण्यासाठी बंधाऱ्यावर गेल्या. सोबत कार्तिक, आदित्य आणि अविनाश हेही गेले होते. यावेळी नियतीने डाव साधला.

# विषय शिक्षकांना वेतनश्रेणीचा मार्ग मोकळा

प्रतिनिधी १७मे

**यवतमाळ:** जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत सरसकट विषय शिक्षकांना वेतनश्रेणी देण्याच्या मागणीला अखेर न्यायालयीन पातळीवर यश मिळाले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सर्व विषय शिक्षकांना 'समान काम, समान वेतन' या तत्त्वानुसार वेतनश्रेणी लागू करण्याचे निर्देश राज्य शासन आणि संबंधित जिल्हा परिषदांना दिले आहेत. या निर्णयामुळे यवतमाळ जिल्ह्यातील हजारो विषय शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# विदर्भ होरपळला!

## अमरावती-वर्ध्यात पारा ४६ अंशांवर

प्रतिनिधी १७मे

**शेगाव :** विदर्भात उष्णतेचा कहर दिवसेंदिवस अधिक तीव्र होत आहे. शनिवारी अमरावती आणि वर्धा जिल्ह्यांनी 'हॉटस्पॉट'ची नोंद केली. या दोन्ही जिल्ह्यांमध्ये कमाल तापमान तब्बल ४६ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्याने नागरिक अक्षरश: होरपळून निघाले. उष्ण वाऱ्यांचा मारा आणि अंगाची लाही लाही करणारी कडक ऊन यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये तापमान सरासरीपेक्षा अधिक असल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. पुढील काही दिवस विदर्भात उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

| तापमान (अंश सेल्सिअस) | |
|---|---|
| वर्धा | ४६ |
| अमरावती | ४६ |
| अकोला | ४५.४ |
| यवतमाळ | ४५.२ |
| नागपूर | ४३.८ |
| चंद्रपूर | ४३.६ |
| वाशिम | ४३.२ |
| बुलडाणा | ४१.६ |

# ट्रक- दुचाकीच्या धडकेत एक ठार, एक जखमी....!

प्रतिनिधी १७मे

**मेडशी :** वाशिम महामार्गावर सरपंच हॉटेलजवळ राष्ट्रीय महामार्गावरील मेडशी बायपासवर भरधाव ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने एक जण जागीच ठार व एक जण गंभीररीत्या जखमी झाला. ही घटना १६ मे रोजी रात्री ८.४५ वाजताच्या सुमारास घडली.

राष्ट्रीय महामार्गावरील सरपंच हॉटेल समोरील बायपासजवळ ट्रक क्र. एमएच ०४ एयू १७६० हा भरधाव वेगाने वाशिमहून अकोलाकडे जात असताना दुचाकी क्र. एमएच २८ एसी ४८३७ ला जोरदार धडक दिली. अपघातातील जखमीला उपचारासाठी



अकोल्याला हलविण्यात आले आहे. या दुर्घटनेत मालेगाव तालुक्यातील राजुरा येथील पुरुषोत्तम उर्फ बबन पंजाब राऊत (३२) हा गंभीर जखमी झाला असून सत्तारखॉं अलीयारखॉं पठाण (३५) याचा मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. दोघांना ॲम्ब्युलन्सद्वारे तातडीने अकोल्यातील रुग्णालयात पाठविण्यात आले.

### मेडशी बायपास बनला कर्दनकाळ

आतापर्यंत येथे सात ते आठ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला असून दोन डझन पेक्षा जास्त नागरिक गंभीरित्या जखमी झाले आहेत. संबंधी विभाग आणखीन किती जणांचे बळी घेण्याचा वाट बघत आहे, असा सवाल ग्रामस्थ करीत आहेत. मेडशी बायपासवर पातूर घाटाप्रमाणे गतिरोधक टाकणे गरजेचे झालेले आहे. योग्य वेळी जर येते प्रशासनाने रस्त्याच्या कामात समय सुचकता दाखवत कारवाई केली नाही तर हा मृत्यू तांडव असाच सुरू राहील, यात काही शंका नाही. निष्पाप नागरिकांचा जीव घेणारा शासनाचा संबंधित विभाग मात्र अजून किती दिवस कुंभकर्णी झोपेत राहील, हे येत्या काळात समजेल.






सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा

रविवार, दि. १७ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# बकर ईद : एक चमत्कार

मुस्लिम समाजामध्ये बकर ईद हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. सामान्य माणसांत हा सण 'बकरी ईद' म्हणून ओळखला जातो. कारण या सणाचे मूळ नाव पवित्र कुरआनातील 'बकर' या अध्यायाच्या नावावरून ठेवण्यात आले आहे. या सणाची पार्श्वभूमी काय आहे आणि जनावरांची कुर्बानी का दिली जाते, हे समजून घेणे आवश्यक आहे.सर्वशक्तिमान, संपूर्ण जगाचा आणि सृष्टीचा निर्माता परमेश्वर अल्लाह यांनी जगातील सर्व जीवसृष्टी निर्माण केली आहे. त्यामध्ये मानवाला सर्वोच्च स्थान देण्यात आले आहे. जगातील सर्व निर्मिती ही मानवाच्या उपयोगासाठी निर्माण करण्यात आली आहे. मनुष्याने आपल्या आवश्यक गरजांसाठी त्यांचा योग्य उपयोग करावा.

या सृष्टीमध्ये परमेश्वराने अनेक प्रकारचे प्राणी, पशू आणि पक्षी निर्माण केले आहेत. प्रत्येक जीव आपापल्या पद्धतीने जीवन जगतो. समुद्रातील मोठे मासे लहान माशांना खाऊन जगतात. जमिनीवरही अनेक प्राणी इतर प्राण्यांवर अवलंबून असतात. जंगलातील सिंह, वाघ यांसारखे मांसाहारी प्राणी इतर प्राण्यांची शिकार करून आपली भूक भागवतात. तर गायी, हरीण यांसारखे शाकाहारी प्राणी वनस्पती, गवत आणि पाने खाऊन जगतात.

वनस्पतींनाही जीवन असते, हे वैज्ञानिकांनी सिद्ध केले आहे. प्रसिद्ध शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस यांनी वनस्पतींमध्येही संवेदना असतात हे प्रयोगांद्वारे दाखवून दिले. त्यामुळे सृष्टीतील प्रत्येक घटकाचे जीवनचक्र एकमेकांशी जोडलेले आहे.

सुमारे चार हजार वर्षांपूर्वी लोक आपल्या मुलांची बळी देऊन परमेश्वराला प्रसन्न करण्याची प्रथा पाळत असत. परंतु सुमारे तीन हजार वर्षांपूर्वी प्रेषित इब्राहीम (अ.) यांनी जगाला एकेश्वरवादाचा संदेश दिला. ते यहुदी, ख्रिश्चन आणि मुस्लिम या तिन्ही मोठ्या धर्मसमूहांमध्ये आदराने स्मरण केले जातात.

प्रेषित इब्राहीम (अ.) यांना वयाच्या ८५व्या वर्षी पुत्रप्राप्ती झाली. त्यांच्या मुलाचे नाव इस्माईल ठेवण्यात आले. एके दिवशी प्रेषित इब्राहीम (अ.) यांना स्वप्नामध्ये परमेश्वराकडून आपल्या प्रिय पुत्राची कुर्बानी देण्याची आज्ञा मिळाली. त्यांनी ही गोष्ट आपल्या पुत्राला सांगितली. त्यावर पुत्र इस्माईल यांनी अत्यंत नम्रतेने उत्तर दिले, 'बाबा, जर ही परमेश्वराची इच्छा असेल तर आपण मला त्यासाठी तयार समजा.'

यानंतर प्रेषित इब्राहीम (अ.) आपल्या पुत्राला घेऊन कुर्बानी देण्यासाठी एका ठिकाणी गेले. त्यांनी आपल्या मुलाच्या डोळ्यांवर पट्टी बांधली आणि कुर्बानी देण्याची तयारी केली. परंतु परमेश्वराने त्यांच्या श्रद्धेची आणि आज्ञाधारकतेची परीक्षा घेतली होती. त्याच वेळी एक चमत्कार घडला आणि इस्माईल यांच्या जागी एक मेंढा (बकरा) कुर्बानीसाठी प्रकट झाला. त्या दिवसापासून मानवबळीची प्रथा संपुष्टात आली आणि त्याऐवजी जनावरांची कुर्बानी देण्याची प्रथा सुरू झाली. या घटनेतून परमेश्वराप्रती निष्ठा, त्याग आणि आज्ञाधारकता यांचा संदेश दिला जातो. म्हणूनच मुस्लिम समाजामध्ये दरवर्षी बकर ईद मोठ्या श्रद्धा आणि उत्साहाने साजरी केली जाते.

कुर्बानीचा खरा अर्थ केवळ जनावराची बळी देणे नसून, आपल्या अहंकाराचा, वाईट प्रवृत्तींचा आणि स्वार्थाचा त्याग करून परमेश्वराच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा घेणे हा आहे.

इद्रीस खान
पुसद मो. ९४२२१९२९५४

# लसीकरण पद्धतीचे जनक एडवर्ड जेन्नर!

दिन विशेष



आज जयंती

एडवर्ड जेन्नर हे ब्रिटिश शास्त्रज्ञ होते. यांनी देवी रोगावर संशोधन केले आणि लसीचा शोध लावला. एडवर्ड जेन्नर यांना लसीकरण पद्धतीचे जनक मानले जाते. लसीकरणाची उपचार पद्धत जेन्नर यांच्यामुळेच जगप्रसिद्ध झाली आणि तेव्हापासूनच वेगवेळ्या आजारापासून वाचण्यासाठी लसीकरणाचा वापर केला जाऊ लागला. एखाद्या आजाराविरोधी लस दिल्यानंतर त्या आजाराविरुद्ध शरीर लढण्यास सक्षम होते व तो आजार लस घेतलेल्या माणसाला काहीच इजा पोहचू शकत नाही. त्यांच्या काळात १० टक्के ब्रिटिश लोक देवी रोगाने मृत्युमुखी पडत होते.खेड्यांमध्ये तर या रोगाचा दुषप्रभाव अधिकच भयावह होता. कारण गावामध्ये हा रोग सहज पसरायचा. खेड्यामध्ये २० टक्के जनता या रोगाने ग्रासित होती.

ग्लुसस्टरशायरमधील बर्कली नावाच्या एका छोट्याशा गावात एडवर्ड यांचा जन्म १७ मे १७४९ रोजी झाला.एडवर्ड यांच्या वडिलांचे नाव स्टीफन जेन्नर हे होते.ते धर्मोपदेशक होते. बर्कलीजवळ त्यांच्या मालकीची बरीचशी जमीन होती.एडवर्ड मिळून एकूण आठ भावंडं होती. एडवर्ड सर्वात लहान होते. आठमधील पुढे सहा भावंडे जिवंत राहिली. एडवर्ड पाच वर्षांचे असतानाच त्याची आई वारली. पुढे दोन महिन्यांनी वडीलही वारले. पुढे त्यांचा सांभाळ त्याच्या दोन मोठ्या भावांनी व तीन बहिणींनी केला. त्यांचा एक भाऊ स्टीफन वडिलांसारखा धर्मोपदेशक झाला.या वयातच एडवर्ड यांना वनस्पती व प्राणी यांचे अवशेष शोधण्याचा छंद जडला होता.

एडवर्ड आठ वर्षांचा असताना त्याला बोर्डिंग स्कूलमध्ये दाखल केले. बोर्डिंग स्कूलमध्ये घरची परिस्थिती बेताची असणाऱ्या विद्यार्थ्यांना घेतले जात असे म्हणूनच अनाथ झालेल्या जेन्नर भावंडांनी हा निर्णय घेतला होता. काही कारणांमुळे एडवर्डला त्याच्या भावंडांनी तेथून काढून एका लहान खासगी शाळेत घातले. तेथे त्याने ग्रीक, लॅटिन यांबरोबरच धार्मिक शिक्षणही घेतले. सर्जनचा सहाय्यक होण्यासाठी जेवढे हवे तेवढे शिक्षण एडवर्ड यांचे झाले होते. त्यानंतर एडवर्ड यांनी डॉ. डेनियल लुडलव्ह यांच्या हाताखाली वयाच्या १४ व्या वर्षी सात वर्षे काम केले.

डॉ. जेन्नर यांच्या पद्धतशीर प्रयत्नांनी लसीकरणाची नवीन पद्धत अमलात आली. आधुनिक वैद्यकीय इतिहासात इ.स. १८०२ साली ब्रिटिश डॉक्टर एडवर्ड जेन्नरने देवीच्या लसीचा शोध लावून त्याचा यशस्वी वापर केल्यामुळे तिथून देवी रोगाच्या निर्मूलनाच्या लढ्याची सुरुवात मानतात.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात त्यांची सर्वात जुनी आणि सर्वात प्राथमिक ओळख असल्याने, लसींनी आधुनिक औषधाच्या पद्धतीचा मूलत: बदल केला आहे आणि काही अत्यंत विनाशकारी मानवी रोगांचा प्रादुर्भाव दूर केला आहे. मानवजातीला दोन शतकांपेक्षा जास्त काळ लसींचा फायदा झाला आहे, परंतु प्रभावी लसांचा शोध घेण्याचा मार्ग लांब आणि कठीण होता. या कामासाठी अनेक शूर संशोधन पथक आणि क्लिनिशियन आवश्यक होते.

लसीच्या इतिहासाची सुरुवात चेचकांच्या कथेपासून होते. स्मॉलपॉक्स हा एक विकृत करणारा, अनेकदा जीवघेणा संसर्गजन्य रोग होता जो शतकानुशतके मानवतेला त्रास देत होता.१८ व्या शतकातील युरोपमध्ये, चेचक सर्वत्र पसरले होते. सुरुवातीच्या विद्वानांनी हे ओळखले की चेचकपासून वाचलेले लोक या आजारापासून रोगप्रतिकारक आहेत. इ.स. १००० च्या सुरुवातीस चिनी रूग्णांनी चिंचोळ्याच्या घशातून खवखवलेले पदार्थ आणि निरोगी रूग्णाच्या नाकात चूर्ण पदार्थ उडवून रूग्णांना रोगप्रतिबंधक रोगाचा प्रारंभ करण्यास मदत केली. रोगप्रतिबंधक लस टोचणे, लसीकरण करण्याचे सर्वात जुने स्वरूप आणि या प्रकरणात व्हेरिओलेशन म्हणून ओळखले जाते ( व्हॅरिओला विषाणूपासून बचाव करण्यासाठी ) १८ व्या शतकात युरोप आणि उत्तर अमेरिकेत ओळख झाली. यावेळी, सामान्यत: निरोगी व्यक्तीच्या त्वचेमध्ये बनविलेले पातळ चेचक स्कॅब किंवा पुस्टुल्समधून द्रव घासून वरवरच्या स्क्रॅचमध्ये भिजवून ही प्रक्रिया चालविली जात असे. रूग्णास चेचकसारख्या फुफ्फुसांचा विकास होईल, परंतु सामान्यत: कमी-गंभीर आजार होतो. तथापि, उल्लंघन करणे ही जोखीमशिवाय नव्हता, कारण वेगवेगळ्या व्यक्तींना चेचक स्वतःच पीडित होऊ शकतो किंवा सिफलिस सारख्या प्रक्रियेद्वारे अजाणतेपणे दुसऱ्या रोगाने संक्रमित होऊ शकतो. १७५७ मध्ये , हजारो मुलांपैकी एक, आठ वर्षांचा एडवर्ड जेनर होता. लहान असताना, जेनरला विज्ञान आणि निसर्गाची तीव्र आवड होती, ज्यामुळे ते औषध, शस्त्रक्रिया आणि प्राणीशास्त्र यांचा अभ्यास करू शकले. अखेरीस तो लंडनबाहेरील ग्रामीण इंग्लंडमध्ये स्थायिक झाला आणि औषधाचा सराव करायला लागला. त्याच्या अभ्यासाचा एक भाग म्हणून, जेनरने आपल्या रूग्णांवर व्हायोलेशन केले. या ग्रामीण परिस्थितीत तो शिकला की दुग्धशाळेतील लोक आणि इतर व्यक्ती ज्यांना काउपॉक्सचा संसर्ग झाला होता, ज्याला काही लहान पुटकुळ्यांनी केलेले एक लहानसे संक्रमण होते, नंतर तो चेचक बनणार नाही. तसेच असेही त्यांनी निदर्शनास आणले की त्यांना अशा लोकांमध्ये चेचकसह यशस्वीरित्या रोगप्रतिबंधक रोग ठेवणे शक्य नाही. हे संबंध लक्षात घेता, जेनरने असा निष्कर्ष काढला की काउपॉक्स केवळ चेचकपासून संरक्षणच देत नाही तर संरक्षणाची जाणीवपूर्वक यंत्रणा म्हणून एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीपर्यंत देखील संक्रमित होऊ शकते .

# पोटावरील चरबी कमी करण्याचे खरे विज्ञान


**जिममधील प्रशिक्षक असो किंवा आहारतज्ज्ञ :** जवळपास प्रत्येक नवीन सदस्याचा पहिला प्रश्न एकच असतो, 'सर, माझं पोट कमी होईल ना?' कारण वाढलेलं पोट हे केवळ दिसण्यापुरतं मर्यादित राहत नाही, तर ते व्यक्तिमत्त्व, फिटनेस आणि आत्मविश्वासाशीही जोडलेलं असतं.

नेमकी पोटावरील चरबी म्हणजे काय? लोक सर्वप्रथम त्यालाच लक्ष्य का करतात? आणि खरंच काही निवडक व्यायाम केल्याने पोटावरील चरबी लवकर कमी होते का?

सोप्या भाषेत सांगायचं झालं तर, पोटाच्या आसपास साचणाऱ्या अतिरिक्त चरबीला पोटावरील चरबी (बेली फॅट) म्हटलं जातं. आजची बैठी जीवनशैली, चुकीच्या खाण्याच्या सवयी, ताणतणाव, अपुरी झोप आणि कमी शारीरिक हालचाल यामुळे पोटावरील चरबी वाढण्याचं प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे.

अनेक लोकांचा असा समज असतो की, फक्त पोटाचे व्यायाम, क्रंचेस किंवा ॲब्सचे वर्कआउट केल्याने पोटावरील चरबी लवकर कमी होते. पण इथेच सर्वात मोठा गैरसमज आहे.

फक्त पोटावरील चरबी कमी करणे, हातावरील चरबी कमी करणे किंवा मांड्यांवरील चरबी कमी करणे म्हणजे शरीराच्या एखाद्या ठराविक भागातील चरबी कमी करण्याचा प्रयत्न. यालाच फिटनेसच्या भाषेत 'स्पॉट रिडक्शन' असं म्हटलं जातं. मात्र, एक महत्त्वाचं सत्य म्हणजे स्पॉट रिडक्शन प्रत्यक्षात शक्य नाही.





**जिम असो, झुंबा असो किंवा तासन्तास चालणारं कार्डिओ :** बहुतेक लोकांचा एकच उद्देश असतो, तो म्हणजे पोटावरील चरबी कमी करणे. आज जिममध्ये सर्वाधिक सदस्यत्व घेणाऱ्यांमध्ये पोटावरील चरबी कमी करू इच्छिणाऱ्यांची संख्या मोठी आहे.

यामागचं विज्ञान अगदी सोपं आहे. आपलं शरीर चरबी एका ठराविक भागातून नाही, तर संपूर्ण शरीरातून ऊर्जेसाठी वापरतं. म्हणजेच, फक्त पोटाचे व्यायाम केल्याने फक्त पोटावरील चरबी कमी होत नाही किंवा हाताचे व्यायाम केल्याने फक्त हातावरील चरबी कमी होत नाही. चरबी कमी होण्याची प्रक्रिया ही नेहमी संपूर्ण शरीराशी संबंधित प्रक्रिया असते.

मग लोक पोटावरील चरबीलाच सर्वात जास्त लक्ष्य का करतात? कारण वाढलेलं पोट हे सर्वात आधी आणि सर्वात जास्त दिसून येतं. पोटावरील चरबीमुळे केवळ शरीराचा दिसण्याचा अंदाज बदलत नाही, तर अनेक वेळा व्यक्तीचा आत्मविश्वासही कमी होऊ लागतो. आवडीचे कपडे नीट न बसणे, फोटो काढताना संकोच वाटणे किंवा स्वतःच्या शरीराविषयी अस्वस्थ वाटणे — अशा अनेक गोष्टी मानसिक परिणामही घडवू शकतात. त्यामुळे बहुतेक लोकांच्या फिटनेस प्रवासातील पहिलं लक्ष्य म्हणजे 'पोट कमी करणं' हेच असतं.

मात्र, पोटावरील चरबी कमी करण्याच्या नादात अनेक लोक चुकीचे मार्ग स्वीकारताना दिसतात. तासन्तास कार्डिओ करणे, पोटाचे अतिप्रमाणात व्यायाम करणे — जसे १०० ते २०० क्रंचेस मारणे किंवा वजनात पटकन फरक दिसावा म्हणून दिवसभर उपाशी राहणे, हे प्रकार आज खूप सामान्य झाले आहेत. पण खरं पाहता, हे शरीराला योग्य पद्धतीने प्रशिक्षित करण्यापेक्षा अनेकदा शरीराला शिक्षा देण्यासारखे ठरतात.

एक गोष्ट समजून घेणं खूप गरजेचं आहे — जसं शरीरावर चरबी एका दिवसात तयार होत नाही, तसंच ती एका दिवसात किंवा काही दिवसांत अचानक कमीही होत नाही. चरबी कमी होणं ही एक हळूहळू होणारी प्रक्रिया आहे, ज्यासाठी योग्य आहार, नियमित व्यायाम, शक्तिवर्धक प्रशिक्षण, कार्डिओ, पुरेशी झोप आणि सातत्य आवश्यक असतं.

दुर्दैवाने, अनेक लोक संयम न ठेवता शॉर्टकट किंवा चुकीचे मार्ग स्वीकारतात. परिणामी पोटावरील चरबी कमी होण्याऐवजी शरीराची ताकद कमी होणे, स्नायू कमी होणे, थकवा येणे, शरीराची कार्यक्षमता मंदावणे आणि एकूण आरोग्य बिघडणे अशा समस्या निर्माण होऊ शकतात.

अशा परिस्थितीत एक चांगला जिम आणि योग्य प्रशिक्षक खूप महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. कारण प्रत्येक व्यक्तीची शरीररचना, जीवनशैली, ताकद आणि फिटनेसचं उद्दिष्ट वेगळं असतं. त्यामुळे सर्वांसाठी एकच व्यायाम पद्धत किंवा आहार योग्य असेलच असं नाही. एक चांगला प्रशिक्षक व्यक्तीची क्षमता आणि उद्दिष्ट लक्षात घेऊन योग्य व्यायाम पद्धती, शक्तिवर्धक प्रशिक्षण, कार्डिओ आणि मूलभूत आहार मार्गदर्शन देण्याचा प्रयत्न करतो. तसेच चुकीच्या माहितीमुळे अतिव्यायाम, चुकीचा आहार किंवा चुकीच्या पद्धतींकडे वळणाऱ्या लोकांना योग्य दिशा दाखवण्याचं कामही करतो. तसंच, एक चांगलं जिमचं वातावरण केवळ व्यायामापुरतं मर्यादित नसतं, तर ते शिस्त, सातत्य आणि प्रेरणा टिकवून ठेवण्यास मदत करतं. योग्य मार्गदर्शन आणि सातत्य यामुळे पोटावरील चरबी कमी करण्याचा प्रवास अधिक सुरक्षित, प्रभावी आणि दीर्घकाळ टिकणारा होऊ शकतो.



गणेश अंभोरे
द फिटनेस हब
फिटनेस प्रोफेशनल
ॲंड न्यूट्रिशनिस्ट

# जन्माचे अध्यात्मीकरण आणि मानव जीवनाचे खरे उद्दिष्ट

मनुष्य जन्म हा केवळ अन्न, वस्त्र, निवारा, पैसा, कुटुंब आणि सुखसोयी यापुरता मर्यादित नाही. प्रत्येकाच्या मनात कधी ना कधी हा प्रश्न उभा राहतो की — 'मी या पृथ्वीवर का आलो आहे?', 'ईश्वराने मला कोणत्या कार्यासाठी पाठवले आहे?', 'मी जे जीवन जगतो आहे ते योग्य आहे का?', 'फक्त स्वतःसाठी आणि कुटुंबासाठी जगण्यातच माझा जन्म संपून जाणार का?'

हे प्रश्न निर्माण होणे म्हणजेच अंतर्मन जागृत होण्याची सुरुवात होय. ज्याच्या अंतःकरणात असे प्रश्न निर्माण होतात, तो माणूस केवळ देहाने जगत नाही तर आत्म्याच्या शोधाकडे प्रवास सुरू करतो.

भारतीय अध्यात्मानुसार मनुष्य जन्म हा अनंत योनींमधून मिळालेला अत्यंत दुर्मिळ आणि श्रेष्ठ जन्म मानला जातो. कारण इतर जीव फक्त भोगासाठी जन्म घेतात; परंतु मनुष्याला विचार करण्याची, विवेक वापरण्याची आणि सत्याचा शोध घेण्याची क्षमता दिलेली आहे.

ईश्वराने मनुष्याला पृथ्वीवर पाठवले ते केवळ संसार करण्यासाठी नाही, तर आत्मज्ञान प्राप्त करून स्वतःचे खरे स्वरूप ओळखण्यासाठी. मनुष्य हा शरीर नाही, तर तो आत्मा आहे. शरीर नश्वर आहे, परंतु आत्मा अमर आहे. आपण स्वतःला फक्त नाव, नाते, पैसा, पद, व्यवसाय आणि शरीर यांच्यापुरते मर्यादित समजतो; हीच सर्वात मोठी अज्ञानाची अवस्था आहे.

अध्यात्म सांगते की, 'स्वतःला ओळखा.' कारण जो स्वतःला ओळखतो, तोच ईश्वराला ओळखू शकतो. ईश्वराने मानवाला कोणत्या कार्यासाठी पाठवले?

ईश्वराचे कार्य म्हणजे प्रेम, करुणा, सत्य, धर्म आणि मानवतेचा प्रसार. जेथे द्वेष आहे तेथे प्रेम निर्माण करणे, जेथे अंधार आहे तेथे ज्ञानाचा दीप लावणे, जेथे दुःख आहे तेथे आधार देणे — हेच खरे ईश्वरी कार्य आहे.

प्रत्येक व्यक्तीला काही विशेष गुण, क्षमता आणि संवेदना दिलेल्या असतात. कोणाला ज्ञान देण्याची क्षमता असते, कोणाला सेवा करण्याची, कोणाला समाज घडवण्याची, तर कोणाला कला आणि संस्कार जपण्याची.

ईश्वर कोणालाही विनाकारण पृथ्वीवर पाठवत नाही. प्रत्येकाचा जन्म एका उद्देशाने झालेला असतो.परंतु माणूस संसार, मोह, पैसा, स्पर्धा आणि अहंकार यांच्या जाळ्यात अडकून त्या उद्देशाला विसरतो.

### आपण चुकतो कुठे?

आजचा माणूस बाहेरून खूप प्रगत झाला आहे; पण आतून रिकामा होत चालला आहे.

आपण आयुष्यभर पैसा कमवण्यात, प्रतिष्ठा मिळवण्यात आणि इतरांशी तुलना करण्यात इतके गुंततो की, स्वतःच्या आत्म्याचा आवाज ऐकायलाच वेळ उरत नाही. फक्त 'माझं घर, माझं कुटुंब, माझं सुख' एवढ्यापुरतं जीवन मर्यादित झालं तर तो स्वार्थी प्रवास ठरतो. संसार करणे चुकीचे नाही; पण संसारात अडकून ईश्वराला विसरणे ही खरी चूक आहे.

जेव्हा मनुष्य खोटेपणा करतो, दुसऱ्याला दुःख देतो, अहंकार बाळगतो, लोभ आणि मत्सर वाढवतो, स्वार्थासाठी इतरांचा वापर करतो, फक्त भौतिक सुखालाच जीवन समजतो. तेव्हा तो आपल्या मूळ उद्देशापासून दूर जातो. जन्म यशस्वी होणे म्हणजे प्रसिद्धी, पैसा किंवा मोठेपणा नव्हे. खरा यशस्वी जन्म तोच, ज्यामध्ये मनुष्याने स्वतःच्या आत्म्याला शुद्ध केले, इतरांना प्रेम दिले आणि ईश्वराशी नाते जोडले. त्यासाठी काही गोष्टी जीवनात आवश्यक आहेत —सत्य आणि प्रामाणिकपणा, सत्य हेच ईश्वराचे स्वरूप आहे. खोटेपणावर उभारलेले जीवन बाहेरून मोठे दिसले तरी आतून रिकामे असते. जेथे स्वार्थ संपतो तेथे अध्यात्म सुरू होते. गरीब, दुःखी, गरजू आणि निराधार लोकांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे. मन सतत बाहेर धावत असते. नामस्मरण आणि ध्यानामुळे मन शांत होते आणि आत्म्याशी संपर्क निर्माण होतो. 'मी' आणि 'माझं' हा अहंकारच दुःखाचे मूळ कारण आहे.

जेव्हा मनुष्य स्वतःला ईश्वराचे माध्यम समजू लागतो, तेव्हा त्याचं जीवन पवित्र होतं. द्वेष मनाला जखडतो; प्रेम मुक्त करते. क्षमा करणारा मनुष्य आतून हलका होतो. जसं अन्न शरीर घडवतं, तसंच विचार मन घडवतात. चांगल्या लोकांचा सहवास आणि सत्संग जीवनाला योग्य दिशा देतो. दुसऱ्याचा अपमान करू नये. अन्याय आणि फसवणूक करू नये. लोभ, क्रोध, मत्सर वाढवू नये. व्यसनांच्या आहारी जाऊ नये, स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजू नये.

**निष्कर्ष**

मानवजन्म हा ईश्वराने दिलेला एक अमूल्य अवसर आहे. हा जन्म केवळ स्वतःसाठी जगण्यात वाया घालवायचा नाही, तर प्रेम, सेवा, सत्य आणि आत्मज्ञान यासाठी वापरायचा आहे. संसार करा, कर्तव्य निभवा, कुटुंब सांभाळा; पण त्यात इतके अडकू नका की स्वतःच्या आत्म्यालाच विसरून जाल. जीवनाचा खरा अर्थ बाहेर शोधण्यात नाही, तर स्वतःच्या अंतर्मनात डोकावण्यात आहे. ज्यादिवशी मनुष्य स्वतःला ओळखेल, त्या दिवशी त्याला ईश्वरही सापडेल. आणि ज्या जीवनात ईश्वराची जाणीव जागृत होते, तेच जीवन खऱ्या अर्थाने यशस्वी ठरते.

निवृत्ती तायडे
हिवरखेड.मो.७७०९५१७७०१

सिटी न्यूज सुपरफास्ट संमिश्र

# कर्जमाफीचा एक तरी लाभार्थी दाखवा

**- सरकारला बक्षीस देऊ!**
**- किसान काँग्रेसचा सरकारवर हल्लाबोल**

**अकोट :** कर्जमाफीची केवळ घोषणा करून राज्य सरकारने शेतकऱ्यांची दिशाभूल केली असून, अद्याप एकाही शेतकऱ्याला प्रत्यक्ष लाभ मिळालेला नाही, असा घणाघाती आरोप अकोला जिल्हा किसान काँग्रेसने केला. 'संपूर्ण महाराष्ट्रात कर्जमाफीचा एक तरी लाभार्थी दाखवा आणि बक्षीस मिळवा,' असे खुले आव्हानही किसान काँग्रेसने सरकारला दिले.

येथे आयोजित पत्रकार परिषदेत किसान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रवी पाटील अरबट यांनी केंद्र व राज्य सरकारच्या कृषी धोरणांवर जोरदार टीका केली. खरीप हंगाम तोंडावर असताना शेतकरी नव्या पीककर्जापासून वंचित असून, कर्जमाफीचे निकषही अद्याप



स्पष्ट नसल्याने शेतकरी आणि बँक प्रशासनात संभ्रमाचे वातावरण असल्याचे त्यांनी सांगितले. बी-बियाणे, खते, कीटकनाशके आणि कृषी निविष्ठांच्या वाढत्या किमतींमुळे उत्पादन खर्च प्रचंड वाढला आहे. मात्र, शेतमालाला हमीभाव मिळत नसल्याने शेती व्यवसाय तोट्यात गेला असल्याची भूमिका यावेळी मांडण्यात आली. खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून शेतकऱ्यांची लूट सुरू असल्याचा आरोपही करण्यात आला.एल-निनोच्या पार्श्वभूमीवर पुढील १२ महिने अत्यंत गंभीर ठरणार असून, पाणीटंचाई, चाऱ्याची कमतरता आणि संभाव्य दुष्काळाचा धोका निर्माण झाला आहे. मात्र, सरकारकडून कोणतीही ठोस तयारी दिसत नसल्याची टीका किसान काँग्रेसने केली.

पत्रकार परिषदेला अनोक राहणे, सारंग मालानी, प्रमोद चोरे, बाळासाहेब बोंद्रे, महेश गणगणे, प्रशांत गावंडे,संजय आठवले यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# हातगाव ते जुना पातूर रस्ता १५ वर्षांनंतर वाहतुकीसाठी खुला

**प्रशासनाचा निर्णय**

**मूर्तिजापूर :** हातगाव ते जुना पातूर हा अत्यंत महत्त्वाचा ग्रामीण रस्ता गेल्या १५ वर्षांपासून बंद होता. यामुळे परिसरातील ग्रामस्थांना आणि शेतकऱ्यांना वाहतुकीसाठी मनस्ताप सहन करावा लागत होता. अखेर प्रशासनाने राबविलेल्या एका विशेष मोहिमेमुळे हा रस्ता १३ मे २०२६ रोजी वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. यामुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला आहे.

हा रस्ता खुला करण्यासाठी उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल



विभागाने मोहीम राबवली. तहसीलदार शिल्पा बोबडे, मंडळ अधिकारी रवींद्र पुरी आणि ग्राम महसूल अधिकारी भारत ढोरे यांनी संयुक्त कारवाई करत कायदेशीर व प्रशासकीय प्रक्रियेद्वारे हा प्रश्न कायमचा मार्गी लावला.

या मोहिमेदरम्यान संबंधित शेतकरी शरद भारूका यांनी समाजहिताचा आणि शेतकऱ्यांच्या अडचणींचा आदर केला. स्वतःच्या शेतातून रस्त्यासाठी जागा उपलब्ध करून दिली.

हा रस्ता पूर्ववत सुरू व्हावा यासाठी शेतकरी सुभाष शेंदूरकर, शुभम इंगळे, सुरेश गोरले, सुशील सातिंगे, प्रवीण सातिंगे, विनायकराव चुडे, शामराव काळमेघ, अब्दुल समीर, सतीश जोगळे, दादाराव सातिंगे, मो. जुनेद, शेख हमीद आणि मो. आसिफ यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या या चिकाटीला अखेर प्रशासकीय मोहिमेमुळे न्याय मिळाला असून, त्यांच्या प्रयत्नांचे चीज झाले.

सिटी न्यूज अकोला
रविवार, दि. १७ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## हिवरखेड सोनाळा मार्गावर कारला धडक

**हिवरखेड :** सोनाळा मार्गावर १६ मे च्या रात्री १०:३० वाजता दरम्यान अकोट हिवरखेड सोनाळा रोडवर हिवरखेड येथील भारत पेट्रोलियम पेट्रोल पंप समोर रोडवरील कामाच्या टिप्पर क्र २७ अऊ ७६४४ ने एका कारला (कार क्र ३० फ १९२९) ला मागून धडक दिली. त्याच वेळी त्याच कारला समोरून सुद्धा एका वाहनाने धडक दिल्याचा विचित्र तिहेरी अपघात हिवरखेड येथे घडला आहे. कार मध्ये एक महाराज आणि इतर असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे.

सुदैवाने या अपघातात जीवित हानी झाली नसल्याचे बोलले जाते. अधिक माहिती मिळू शकली नाही




# अकोला शहरात आनंद मेळाचे भव्य आयोजन

## पहिल्यांदाच 'हवा महल गेटसह 'राजस्थानी थीमवर आधारित आनंद मेळावा

प्रतिनिधी १७ मे

**अकोला :** तुमच्या सुट्ट्यांचा काळ आनंददायी बनवण्यासाठी आणि कडक उन्हापासून आराम देण्यासाठी अकोला शहरात आले आहे आनंदाचे पर्व - आनंद मेळा २०२६. येथे मनोरंजनासोबतच तुम्हाला लकी विनर म्हणून मोफत ई-बाईक स्कूटी जिंकण्याची संधी मिळत आहे. मग उशीर कशासाठी आजच भेट द्या स्वराज भवन, बस स्टँड समोर आयोजित आनंद मेळाव्याला.

अकोला शहरात आतापर्यंत अनेक आनंद मेळाव्यांचे आयोजन झाले असेल, पण पहिल्यांदाच अकोला शहरात 'हवा महल' प्रवेशद्वारासह 'राजस्थानी थीम'वर आधारित आनंद मेळाव्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा आनंद मेळावा पाहण्यासाठी तुम्ही आपल्या कुटुंबासह आणि मित्र-मैत्रिणींसोबत नक्की या आणि आपली संध्याकाळ अधिक रंगतदार बनवा.




विशेष म्हणजे, गेट एंट्री पासच्या माध्यमातून तुम्हाला ई-बाईक जिंकण्याची सुवर्णसंधी मिळू शकते! भाग्यवान विजेत्याला येथे मोफत ई-बाईक दिली जाईल.

यावेळच्या आनंद मेळाव्यात लहान मुलांसाठी आणि मोठ्यांसाठी मनोरंजनाची भरपूर साधने उपलब्ध आहेत. लहान मुलांसाठी वॉटर बोट, मिकी माऊस, भीमचकरी, वॉटर बलून, रिमोट कंट्रोल कार, हेलिकॉप्टर. ड्रॅगन ट्रेन, ड्रॅगन नावडी, गगनचुंबी पाळणे, ब्रेक डान्स पाळणा, बाउन्सी बाउन्सी. दुबई थीम ब्रेक डान्स पाळणा, सलांबो आकाश पाळणा, मिनी ट्रेन, जीप चकरी इत्यादी. मनोरंजनासोबतच येथे खरेदीसाठी कटलरी आणि ज्वेलरीचे मोठे स्टॉल्स लावण्यात आले आहेत, जिथे सर्व आधुनिक डिझाईन्स उपलब्ध आहेत. खवय्यांसाठी येथे एकापेक्षा एक चविष्ट पदार्थ उपलब्ध आहेत, ज्यामध्ये प्रसिद्ध शेगाव कचोरी, साऊथ इंडियन, चायनीज, आणि आईस्क्रीम पार्लरचा समावेश आहे. त्यामुळे आजच सपरिवार येऊन या आनंद मेळाव्याचा लाभ घ्या. मनोरंजनासोबतच खरेदीचा आनंद घ्या आणि मोफत ई-बाईक स्कूटी जिंकण्याची संधी गमावू नका! जर तुम्ही शालेय ग्रुप सोबत आलात, तर तुम्हाला तिकिटावर विशेष डिस्काउंट (सवलत) दिली जाईल. कृपया कॉल करून आपले बुकिंग निश्चित करा. अधिक माहितीसाठी संपर्क: ८४२१९१९१३३ (८४२१९१९१३३)

## सोनाली मोरे जिल्हा महिला इंटकच्या अध्यक्षपदी



**अकोला :** अकोला जिल्हा महिला इंटकच्या अध्यक्षपदी सोनाली योगेश मोरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सोनाली मोरे या अनेक सामाजिक संघटनांशी निगडित असून, महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी अनेक क्षेत्रात चांगले कार्य केलेले आहे.

त्याचप्रमाणे अरुणा संतोष लबडे यांची याच संघटनेत जिल्हा महिला महासचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. इंटक भारतीय राष्ट्रीय मजदूर काँग्रेस महासंघाचे डॉ. हौशीला प्रसाद शर्मा यांचे संमतीने महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ॲड. सुभाष माछरे यांनी ही नियुक्ती केली.

## शेतकरी संघटनेचे एक दिवसीय ठिय्या आंदोलन



प्रतिनिधी १७ मे

**अडगाव बु. :** अडगाव बु. सर्कलमध्ये शेतकरी संघटनेचे एक दिवस ठिय्या आंदोलन पार पडले. यावेळी लक्ष्मीकांत कौठकर विदर्भ अध्यक्ष यांनी १५ पंधरा मे रोजी सहा प्रमुख मागण्या मांडल्या होत्या.

शासकीय खर्चाने निर्माण केलेले तीन शेततळ पैकी एक शेतकरी भरलेले आहे ते सुरुवातीला खोदण्यात यावे, इतर दोन तलावाचे इबलेट व आऊलेट मोकळे करण्यात यावे व इतर दोन तलावाचे खोदलेले भिंती पूर्ववत् करण्यात यावे. सौर प्रकल्प उभारताना वृक्षतोड झाली या मुळे पर्यावरणाचे नुकसान झाले याला अनुसरून मेघा इंजिनिअरिंग कंपनीवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी (५) या ई क्लास जमिनीतुन शेतकऱ्यांचे रस्ते मोकळे करण्यात यावे आणि ई क्लास जमीन कमी भांडे तत्वावर कंपनीला मिळालेली असुन कंपनीचे अधिकारी स्थानिक शेतकऱ्यांवर दादागिरी करत यांच्या विरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी. आंदोलना सहभागी झालेले सर्व परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

## रामटेक येथे शेतरस्ता जेसीबीने खोदल्याचा आरोप

प्रतिनिधी १७ मे

**मूर्तिजापूर :** तालुक्यातील रामटेक येथे शेतकऱ्यांच्या शेतात जाणारा रस्ता जेसीबीने खोदून बंद करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी सरपंच रुपाली अशोक ठाकरे यांच्यासह गावातील शेतकरी व नागरिकांनी तहसीलदारांकडे लेखी तक्रार देत संबंधितांवर कारवाईची मागणी केली आहे.

दिलेल्या निवेदनानुसार, मौजे रामटेक येथील गट क्रमांक ९० मध्ये जाणारा शेतरस्ता गैरअर्जदार अनिल घाटे यांनी जेसीबीच्या सहाय्याने सुमारे साडेतीन फूट खोदल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे पुढील शेतकऱ्यांचा शेतीकडे जाण्याचा मार्ग पूर्णतः बंद झाला असून, शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे अर्जात नमूद करण्यात आले आहे. या प्रकारामुळे



शेतीकामे, वाहतूक तसेच दैनंदिन ये-जा विस्कळीत झाली असून, शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित रस्ता तात्काळ पूर्ववत करून दोषींवर योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अर्जदारांनी तहसील प्रशासनाकडे केली आहे.

## मूर्तिजापुरच्या मदिना उर्दू हायस्कूलचा उत्कृष्ट निकाल

**मुर्तिजापूर :** जुनी वस्ती परिसरातील मदिना उर्दू हायस्कूलचा उत्कृष्ट निकाल लागला. दहावी परीक्षेसाठी ३० विद्यार्थी बसले होते. शाळेचा ९६.२९३निकाल लागला.

हायस्कूलमध्ये गोरगरीब विद्यार्थी शिक्षण घेत आहे. सत्तरच्या वर विद्यार्थ्यांनी गुण प्राप्त केले आहे. अब्दुल अकमल अब्दुल रफिक या विद्यार्थ्याने ७३ .६०३, तर सय्यद साधू सय्यद मुबारक ६५ .८० ३, मुकीद खान मजर खान याने ६० टक्के गुण प्राप्त केले. संस्थेचे अध्यक्ष मुजायक अली मीर मुबारक अली, मुख्याध्यापक अब्दुल वहिद अब्दुल सईद, इलियास खान मुख्तार खान, तरन्नुम बेगम मीर मझर अली, वैभव बनारसे, सैफुल्ला खान साबीर खान यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## अकोट शहर पोलिसांची कारवाई; ३ गोवंश जप्त

प्रतिनिधी १७ मे

**अकोट :** अकोट शहर पोलिसांनी पहाटेच्या सुमारास कांगारपुरा परिसरात कारवाई करत कत्तलीसाठी निर्दयतेने बांधून ठेवलेली तीन गोवंश जातीची जनावरे जप्त केली. या जनावरांची अंदाजित किंमत १ लाख १० हजार रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोलीस स्टेशन अकोट शहर हद्दीत (दि.१६) पहाटे ३.४५ वाजताच्या सुमारास नाईट पेट्रोलिंग सुरू असताना पोहेकॉ गणेश सोळंके यांना गोपनीय



माहिती मिळाली की, कांगारपुरा येथील शौकतअली चौक परिसरात तीन गोवंश जातीची जनावरे कत्तलीसाठी आणून बांधून ठेवण्यात आली आहेत. माहितीच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक अविनाश मोहीते, डीबी पथक व बीएम पथकाने दोन पंचांसमक्ष घटनास्थळी धाड टाकली.

यावेळी सदर ठिकाणी तीन गोवंश जातीची जनावरे निर्दयतेने बांधून ठेवलेली आढळून आली. जनावरांबाबत परिसरातील नागरिकांकडे चौकशी केली असता मालकाबाबत कोणतीही माहिती मिळून आली नाही. त्यानंतर पंचनामा करून अंदाजे १ लाख १० हजार रुपयांची जनावरे जप्त करण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चीत चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी व सहाय्यक पोलीस अधीक्षक निखील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अमोल माळवे यांच्या नेतृत्वात पोउपनि अविनाश मोहीते, पोहेकॉ गणेश सोळंके, नंदू चोपडे, अश्विन चव्हाण, उमेश थोरात, रामेश्वर भगत, शुभम दाते व अजयसिंग ठाकूर यांनी पार पाडली.

## विष्णू खुरसडे यांचा शिवसेना उबाठात पक्षप्रवेश



**पातूर :** नगर परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय वातावरण तापले असून विविध पक्षांमध्ये इनकमिंग-आऊटगोईंग सुरू आहे. अशातच पातूर शहरातील प्रतिष्ठित नागरिक विष्णू खुरसडे यांनी शिवसेना उभाठा पक्षात प्रवेश केला. आमदार नितीन बाप्पू देशमुख व देवलाल भाऊ डाखोरे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.

खुरसडे यांच्या प्रवेशामुळे गुजरी लाईन, खडकेश्वर परिसरातील शिवसेना गटाला मोठे बळ मिळाल्याचे मानले जात आहे. स्थानिक पातळीवर त्यांचा जनसंपर्क व सामाजिक कार्याचा प्रभाव लक्षात घेता आगामी निवडणुकीत या प्रवेशाचा फायदा शिवसेनेला होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.सध्या पातूर शहरात आमदार नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शहर प्रमुख निरंजन बंड तसेच काही माजी नगरपरिषद पदाधिकारी निवडणुकीची रणनीती आखत असून बूथनिहाय तयारी सुरू करण्यात आली आहे.

## अकोला बाजार समितीत 'चिया'ची २३ क्विंटल आवक

**अकोला :** कृषी उत्पन्न बाजार समितीत १५ मे रोजी चिया धान्य विक्रीसाठी आले होते. यावेळी त्याला प्रतिक्विंटल सरासरी १६ हजार ७०० रूपये भाव मिळाला असून, २३ क्विंटलची आवक आली होती. अलीकडे आपल्या भागात चिया या धान्याची लागवड क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. या पिकाचे वाशिम जिल्ह्यात मोठे क्षेत्रफळ असून तेथील शेतकरी याची लागवड करून भरघोस उत्पादन घेत आहे. हळूहळू अकोल्या जिल्ह्यातही या पिकाची लागवड होत असल्याचे दिसून येत आहे.

भगरी सारखे परंतु काळ्या रंगाचे धान्य असून पौष्टिक आहारात मोडते. अकोला जिल्ह्यातही चिया धान्याची लागवड वाढत आहे.

## बार्शिटाकळी नगरपंचायतची मान्सूनपूर्व नाली सफाई व नाल्या बांधकामास सुरुवात

प्रतिनिधी १७ मे

**बार्शिटाकळी :** नगर पंचायतच्या १७ वार्डातील मान्सून पुर्व नाली सफाई व नाल्या दुरुस्ती आणी नवीन नाल्या बांधकामास सुरुवात करण्यात आली.

नगराध्यक्षा अख्तर खातुन अलीमोद्दीन यांच्याकडे १७ ही वार्डातील नगरसेवक, नगरसेविका यांनी बार्शिटाकळी शहरातील तुडुंब भरलेल्या नाल्यांची सफाई तसेच नाली दुरुस्ती व आवश्यक त्या ठिकाणी नवीन नाली बांधकाम करण्याची मागणी केली होती तेव्हा नगरसेवक तथा नगरसेविका यांच्या मागणी ला नगराध्यक्षा अख्तर खातुन अलीमोद्दीन यांनी त्वरित मुख्याधिकारी श्री कंकाळ



यांच्या सोबत चर्चा करून ताबडतोब नगरपंचायत च्या सफाई कर्मचारी यांना सांगुन १७ ही वार्डातील नाली सफाईस सुरुवात करण्यात आली,

तसेच ज्या ठिकाणी नाली दुरुस्ती करावयाची आहे व ज्या ठिकाणी नवीन नाली बांधकाम करावयाची आहे त्या नाल्या बांधकामास मंजुरी देण्यात आली असुन कामाला सुरुवात झालेली आहे.

> बार्शिटाकळी शहरातील नागरिकांना ज्या आवश्यक गरजेनुसार नाल्यांची सफाई, नाल्या बांधकाम, नाली दुरुस्ती तसेच लाईटची व्यवस्था करण्यात मी कटिबद्ध असून यात १७ ही वार्डातील नगरसेवक, नगरसेविका यांचा सहभाग मिळाल्याने कुठलाही वार्ड विकास पासून वंचित राहणार नाही.
>
> **अख्तर खातुन अलीमोद्दीन**
> नगराध्यक्षा बार्शिटाकळी

## २२ ते २५ मे शून्य सावली दिवस

प्रतिनिधी १७ मे

**अकोला** नेहमी आपल्या सोबत असणारी सावली अचानक नाहीशी झाली तर याचा प्रत्यक्ष अनुभव प्रत्येकाला निश्चित घेता येईल. दि.२२ ते २५ मे या चार दिवसांत अकोला जिल्ह्यातील सर्व ठिकाणी ही आगळीवेगळी अनुभुती घेण्याचे आवाहन विश्वभारती केंद्राद्वारे करण्यात येत आहे.

आकाशात आपले स्थान बदलणारा सूर्य जेंव्हा आपल्या अक्षवृत्तीय स्थितीनुसार सरळ रेषेत येतो तेव्हा त्या भागात माध्यान्हाचे वेळी आपली सावली काही क्षण नाहीशी होते. अकोला जिल्हा सुमारे एक अंशीय अक्षवृत्त व रेखावृत्तात असल्याने हा अनुभव जिल्हा भर वेगवेगळ्या दिवशी सर्वांना घेता येईल. पृथ्वी कलुन फिरत असल्याने सूर्याच्या उत्तरेकडे सरकतांना जिल्ह्यातील दक्षिणे कडील पातूर व बार्शीटाकळी तालुक्यातील दक्षिण भागात दि.२२ मे ला, अकोला, बाळापूर व मुर्तिजापूर तालुक्यात दि.२३ मे रोजी, पूर्णा नदीच्या पट्ट्यातील भागात दि.२४ मे रोजी आणि दि.२५ मे या दिवशी माध्यान्ह वेळी शून्य सावलीचा अनुभव, स्वतः काही क्षण उभे राहून वा एक/दोन फूट लांबीचे पाईप, उंच आकाराच्या वस्तू वेळेत आधी उभे करायचे, जसजशी वेळ वाढेल तशी सावली कमी होत पूर्ण नाहीशी होईल.

> **रेखावृत्तीय स्थितीनुसार**
>
> आपल्या भागातील दिवसा नुसार पूर्वेकडून ते पश्चिमेकडे दूपारी १२-१६ ते १२-१९ या वेळेत शून्य सावलीचा अनुभव घेता येईल, फक्त कडक उन्हाचा विचार करून आवश्यक ती काळजी घ्यावी. ही खगोलीय घटना पृथ्वीच्या मकर ते कर्कवृत्त या ४७ अंशाच्या पट्ट्यात वर्षातून दोनदा घेता येते पण उन्हाळ्यात ती विशेष असते.

## 'विठ्ठलसुत' काव्यसंग्रहाचे प्रकाशन थाटात

प्रतिनिधी १७ मे

**अकोला :** प्रख्यात गायक, संगीतकार, गीतकार व कवी प्रा. डॉ. नाना विठ्ठलराव भडके यांच्या 'विठ्ठलसुत' काव्यसंग्रहाचे प्रकाशन अकोल्याच्या रालतो विज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात थाटात झाले.

मंचावर ज्येष्ठ विधिज्ञ राधेश्याम मोदी, वि.सा. संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य डॉ. गजानन नारे, ज्येष्ठ नाट्यकलावंत दिलीप देशपांडे, अभिजित परांजपे, सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.डी. सिकची, रालतो विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य चंद्रवंशी, शास्त्रीय गायक प्रा. डॉ. अनिरुद्ध खरे,




कोठारी ग्राफिक्सचे कमलेश कोठारी, लेखक धनंजय देशपांडे या मान्यवरांची उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीपूजन करण्यात आले. लेखक धनंजय देशपांडे यांनी 'विठ्ठलसुत' या काव्यसंग्रहावर लिहिलेल्या समीक्षणाचे अभिवाचन दिलीप देशपांडे यांनी केले. उपस्थित मान्यवरांनी विचार मांडले. कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे वेदश्री प्रतिष्ठानच्या कलावंतांच्या सहकार्याने प्रा. डॉ. नाना भडके यांनी आपल्या काव्यसंग्रहातील एका अभंगाचे गायन केले. त्यांना हार्मोनियमवर रवी कसबेकर, तबल्यावर प्रवीण पंचघरे, मृदुंगावर ज्ञानेश्वर यादगिरे, ऑक्टोपॅडवर सुनील कदम, सिंथेसायजरवर प्रवीण राऊत यांनी साथ केली. निवेदन आणि प्रा. भडके यांच्या सादरीकरणादरम्यान राजेश जोशी यांच्या बासरीवादनाने रंगत आणली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व निवेदन मोहिनी मोडक यांनी केले. प्रा. भडके यांची कन्या पूर्वी हिने वडिलांविषयी मनोगत व्यक्त केले आणि आभारप्रदर्शन केले. कार्यक्रमाला ज्येष्ठ नाट्यकलावंत विद्याताई जोगळेकर, श्रीमती इंगळे, संस्कार भारतीचे महानगराध्यक्ष डॉ. राजकुमार हेडा, साहित्यिक डॉ. रामप्रकाश वर्मा, कवी कृष्णकुमार शर्मा, चंदाताई जयस्वाल, कविद्वय सुनील देशपांडे व प्रशांत असनारे, डॉ.किशोर देशपांडे, अशोक ढेरे, अविनाश परळीकर, सुधीर देशपांडे, यांच्यासह सीताबाई कला महाविद्यालयातील साहित्य रसिकांची उपस्थिती होती.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६
मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर. अकोला
आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!
वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा
इयत्ता १ ली ते १० वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार

मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. ९९२११८६७१५, ९५११२५४९५९, ९४२१८९५७९०, ९९६०४३७३६६

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. १७ मे २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# अवैध कापूस बियाणे विक्रीचा पर्दाफाश

## कळंबमध्ये HTBT बियाण्यांवर छापा; २.२५ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी १७ मे

**यवतमाळ :** कळंब तालुक्यात अनधिकृत आणि भारत सरकारने प्रतिबंधित केलेल्या HTBT कापूस बियाण्यांची अवैध विक्री सुरू असल्याचा प्रकार उघडकीस आला. कृषी विभाग व कळंब पोलीस यांनी संयुक्तपणे केलेल्या कारवाईत मोठ्या प्रमाणात बियाणे, वाहन आणि मोबाईल असा एकूण २.२५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

"R-COT 5G" या नावाने प्रतिबंधित कापूस बियाण्यांची विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर कृषी विभागाच्या पथकाने तातडीने सापळा रचला. या कारवाईत १५० बियाण्यांची पाकिटे जप्त करण्यात आली, ज्यांची किंमत अंदाजे १.६५ लाख इतकी आहे. तसेच गुन्ह्यात वापरलेली एक मोटारसायकल व मोबाईल फोनही जप्त करण्यात आला.





या प्रकरणी अविनाश मधुकर येंडे (रा. कळंब, जि. यवतमाळ) याच्यावर बीज अधिनियम १९६६, बीज नियम १९६८, पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६, कापूस बियाणे अधिनियम २००९ तसेच अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई जि.प. यवतमाळचे मोहीम अधिकारी प्रवीण जाधव, कृषी अधिकारी (गुणवत्ता नियंत्रण) कल्याण बेदरकर, राहुल डाखोरे व वरिष्ठ लिपिक मोरेश्वर येंबडवार यांच्या पथकाने केली. वरिष्ठ कृषी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

कळंब परिसरात प्रतिबंधित बियाण्यांच्या अवैध व्यापारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून कृषी विभागाने अशा प्रकारांवर कठोर कारवाई सुरूच ठेवण्याचा इशारा दिला आहे.

# नागपूर-तुळजापूर महामार्गावर भीषण अपघात; युवक ठार

## संतप्त ग्रामस्थांकडून धाब्याची तोडफोड, महामार्ग रोखला



प्रतिनिधी १७ मे

**यवतमाळ :** नागपूर-तुळजापूर महामार्गावर माळम्हसोला गावाजवळ अज्ञात ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. या अपघातानंतर संतप्त ग्रामस्थांनी अवैध मद्यविक्रीमुळे हा अपघात घडल्याचा आरोप करत संबंधित धाब्यावर तोडफोड केली तसेच महामार्गावर जाळपोळ करून रास्ता रोको आंदोलन छेडले.

मिळालेल्या माहितीनुसार, माळम्हसोला येथील राजेश राठोड हे दुचाकीने जात असताना भरधाव अज्ञात ट्रकने त्यांना जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर ट्रकचालक घटनास्थळावरून पसार झाला.



घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले. अवैध मद्यविक्रीमुळे परिसरात अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचा आरोप करत संतप्त ग्रामस्थांनी माऊली धाब्यावर धडक देत तोडफोड केली. त्यानंतर महामार्गावर टायर जाळून रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

सुमारे दोन तासांपासून महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली असून दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. घटनास्थळी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, अपघातातील फरार ट्रकचा शोध घेण्याचे काम पोलिसांकडून सुरू असून घटनेमुळे परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे.

# भूदान जमिनींची लूट; महसूल प्रशासन 'नॉट रिचेबल'?

## मेटीखेडा परिसरात रेती-मुरूम माफियांचा धुमाकूळ; आदिवासी शेतकऱ्यांची फसवणूक

प्रतिनिधी १७ मे

**कळंब :** मेटीखेडा मंडळ परिसरात बेकायदेशीर रेती, मुरूम आणि माती उत्खननाला उधाण आले असून महसूल प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे माफियांचे फावले असल्याचे चित्र आहे. डोंगर खड्डा परिसरातील भूदान जमिनींवर नियमबाह्य उत्खनन सुरू असून आदिवासी शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक होत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी मात्र कारवाईऐवजी 'नॉट रिचेबल' असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

मेटीखेडा-राळेगाव रस्त्याचे काम करणाऱ्या कंत्राटदार कंपनीकडून डोंगर खड्डा परिसरातील गट क्रमांक २८१ आणि २८२ मधील भूदान जमिनींमधून मोठ्या प्रमाणात मुरूम उपसा सुरू असल्याचे सांगितले जात आहे. विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीतून भूमिहीन व आदिवासी कुटुंबांना वितरित करण्यात आलेल्या या जमिनी केवळ शेतीसाठी वापरण्याची अट असताना त्याच जमिनींवर व्यावसायिक उत्खनन सुरू असल्याने संताप व्यक्त होत आहे.



स्थानिकांच्या माहितीनुसार, आदिवासी शेतकऱ्यांना एका गाडीमागे केवळ २५० रुपये देऊन मुरूम उपशाला परवानगी घेतली जात आहे. प्रत्यक्षात एका ट्रकमधून सात ते आठ ब्रास मुरूम वाहून नेला जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची दिशाभूल करून मोठा आर्थिक फायदा घेतला जात असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, शनिवार-रविवार तसेच शासकीय सुट्ट्यांच्या दिवशी या भागात अवैध उत्खनन आणि वाहतूक अधिक वाढत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. रात्रीच्या वेळी तसेच भरदिवसा विनापरवाना रेती व मुरूम वाहतूक करणारी वाहने मुक्तपणे धावत असतानाही महसूल विभागाकडून रॉयल्टी तपासणी किंवा जप्तीची कारवाई होत नसल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळे शासनाच्या महसुलालाही मोठा फटका बसत असल्याचे बोलले जात आहे.

विशेष म्हणजे, काही महिन्यांपूर्वी महसूल विभागाने केवळ औपचारिक कारवाई करून नंतर या प्रकाराकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. सामान्य शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टरवर कारवाई करणारे अधिकारी मोठ्या कंत्राटदार कंपन्यांच्या वाहनांपुढे मात्र मूकदर्शक का ठरत आहेत, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

बेसुमार उत्खननामुळे अनेक शेती क्षेत्रांमध्ये मोठमोठे खड्डे निर्माण झाले असून भविष्यात ही जमीन कायमची नापीक होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. परिसरात धुळीचे प्रमाण वाढल्याने पर्यावरणीय समतोलही बिघडत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे.

या प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबंधित कंत्राटदार कंपनीवर गुन्हे दाखल करावेत, तसेच बेकायदेशीर उत्खनन त्वरित थांबवावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही स्थानिकांनी प्रशासनाला दिला आहे.

# जंगलातील जलस्त्रोत आटले; वन्यप्राण्यांची भटकंती

प्रतिनिधी १७ मे

**उमरखेड :** तालुक्यात वाढत्या उष्णतेमुळे जंगलातील नैसर्गिक जलस्त्रोत आटू लागल्याने वन्यप्राणी आणि वन्यजीवांना पाण्यासाठी वनवन भटकंती करावी लागत आहे. मार्च महिन्यापासून तापमानात सातत्याने वाढ होत असून अभय अरण्य परिसरासह अनेक वनक्षेत्रांतील नदी, नाले, ओढे आणि पाणवठे कोरडे पडले आहेत. परिणामी वन्यजीव गावांच्या दिशेने धाव घेत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

उन्हाची तीव्रता वाढल्याने जंगलातील तळी आणि पानवठ्यांमध्ये पाण्याचा साठा संपुष्टात आला आहे. त्यामुळे हिंस्र प्राणी तसेच अन्य वन्यजीव घोटभर पाण्यासाठी जंगलाबाहेर पडत असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. अनेक ठिकाणी वन्यप्राणी रस्त्यावर किंवा गावालगत दिसून येत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पर्यावरणप्रेमी आणि ग्रामस्थांनी वनविभागाने तातडीने कृत्रिम पाणवठ्यांची व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे. जंगल परिसरात टँकरद्वारे पाणीपुरवठा करून वन्यजीवांना दिलासा द्यावा, अन्यथा वन्यप्राण्यांचा मानवी वस्त्यांकडे वाढता वावर भविष्यात धोकादायक ठरू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, वाढत्या तापमानामुळे वनक्षेत्रातील जैवविविधतेवरही परिणाम होत असून वन्यजीवांच्या अस्तित्वाचा प्रश्न गंभीर बनत चालल्याचे पर्यावरण अभ्यासकांनी नमूद केले आहे.

# कमी किमतीत सोने देण्याच्या आमिषाने फसवणूक; मुख्य आरोपी जेरबंद

प्रतिनिधी १७ मे

**पुसद :** महागाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत कमी किमतीत गुप्तधनातील सोने देण्याचे आमिष दाखवून १० लाख ८० हजार रुपयांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला असून मुख्य आरोपीला अटक करण्यात आली आहे. आरोपींकडून फसवणुकीतील २ लाख ५ हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे.

या प्रकरणी फिर्यादी संदीप रामचंद्र खोब्रागडे (वय ३४, रा. गोकुळ नगर बायपास, आयटीआय चौक, गडचिरोली) यांनी महागाव पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून २ मे २०२६ रोजी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपींनी कमी किमतीत गुप्तधनातील सोन्याची नाणी देण्याचे आमिष दाखवून फिर्यादीकडून १०.८० लाख रुपये उकळल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते.



या गंभीर गुन्ह्याची दखल घेत कुमार चिंता यांनी स्थानिक गुन्हे शाखेला आरोपींचा शोध घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला.

तपासादरम्यान या प्रकरणातील मुख्य आरोपी विठ्ठल पांडुरंग पवार (रा. पिंपळगाव, ता. पुसद) याचे नाव समोर आले. पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देणाऱ्या आरोपीने पोलिसी चौकशीत अखेर गुन्ह्याची कबुली दिली.

आरोपीने आपल्या सात साथीदारांसह संगनमत करून फिर्यादीला महागाव हद्दीतील दहीसावली परिसरात बोलावले. त्यानंतर बनावट पोलिसांना घटनास्थळी आणून छाप्याचा बनाव करण्यात आला. पोलिसांचा धाक बसल्याने फिर्यादी घटनास्थळावरून पळून गेला आणि आरोपींनी त्याच्याकडील १०.८० लाख रुपये घेऊन पलायन केले, अशी माहिती तपासात समोर आली.

या कारवाईत आरोपीकडून २ लाख ५ हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली असून पुढील तपासासाठी आरोपीला महागाव पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे तसेच महागाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनराज निळे यांच्या नेतृत्वात पार पडली.

# दिव्यांगांच्या मागण्यांसाठी गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन

## २० मेपासून आमरण उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी १७ मे

**झरी :** दिव्यांग संघर्ष सामाजिक संघटना, झरी-जामणीच्या वतीने शुक्रवारी गटविकास अधिकारी, झरी-जामणी यांना विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात निवेदन देण्यात आले. शासनाने दिव्यांगांसाठी राखीव ठेवलेला निधी तातडीने वितरित करावा, अन्यथा २० मे २०२६ पासून पंचायत समिती कार्यालयाच्या प्रांगणात आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अपंग हक्क अधिनियम २०१६ तसेच शासन निर्णयानुसार दिव्यांग बांधवांसाठी राखीव असलेला पाच टक्के निधी थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावा. पंधराव्या वित्त आयोगाच्या माध्यमातून दिव्यांगांसाठी वैयक्तिक लाभाच्या योजना प्रभावीपणे राबविण्याची मागणीही करण्यात आली आहे.



तसेच दिव्यांग लाभार्थ्यांना विनाअट घरकुल मंजूर करावे, व्यवसायासाठी २०० चौरस मीटर जागा उपलब्ध करून द्यावी आणि व्यवसाय उभारणीसाठी आवश्यक साहित्य व साधनसामग्री पुरविण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, सन २०२४-२५ आणि २०२५-२६ या आर्थिक वर्षांमध्ये दिव्यांगांसाठी पाच टक्के निधी राखीव असूनही त्याचे वाटप अद्याप करण्यात आलेले नाही. याबाबत संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाने दखल घेतली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास २० मेपासून पंचायत समिती झरी-जामणी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल. उपोषणादरम्यान उद्भवणाऱ्या कोणत्याही परिस्थितीस संबंधित प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

निवेदनावर तालुक्यातील अनेक दिव्यांग बांधवांच्या स्वाक्षऱ्या असल्याचे सांगण्यात आले.

# राज्यमार्गावरील शेकडो वृक्षांची कत्तल

## शंभर वर्षांहून जुनी झाडे जमीनदोस्त : पर्यावरणाचा समतोल धोक्यात

प्रतिनिधी १७ मे

**उमरखेड :** पुसद-उमरखेड-हरदडा राज्यमार्गाच्या रुंदीकरणाचे काम सुरू असताना रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या लिंब व बाभळीच्या शेकडो वृक्षांची मोठ्या प्रमाणात तोड करण्यात येत असल्याने पर्यावरणप्रेमींमध्ये संताप व्यक्त होत आहे. विशेषतः शंभर वर्षांहून अधिक जुनी लिंबाची विशाल झाडे तोडली गेल्याने प्रवाशांचा सावलीचा आसरा हिरावला गेला असून परिसर ओसाड झाल्याचे चित्र दिसत आहे.

उन्हाळ्याच्या तीव्र उष्णतेत या वृक्षांमुळे प्रवासी, वाहनचालक आणि पादचारी यांना मोठा दिलासा मिळत होता. अनेक प्रवासी रस्त्यालगतच्या लिंबाच्या झाडाखाली थांबून विश्रांती घेत असत. मात्र, रस्त्याच्या कामादरम्यान मोठमोठी झाडे तोडण्यात आल्याने आता संपूर्ण मार्ग निर्मनुष्य आणि उजाड दिसत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, रस्त्याच्या सुरक्षेसाठी तसेच पर्यावरण संतुलन राखण्यासाठी ही झाडे महत्त्वाची होती. मात्र, विकासकामाच्या नावाखाली वृक्षतोड करून पर्यावरणाची हानी करण्यात येत असल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे, रस्त्याचे कामही संथ गतीने सुरू असल्याने झाडांची तोड करूनही नागरिकांना अपेक्षित सुविधा मिळालेल्या नाहीत.



### 'झाडे लावा, झाडे जगवा' घोषणेचे काय?

■ एकीकडे शासनाकडून 'झाडे लावा, झाडे जगवा'चा संदेश दिला जात असताना दुसरीकडे मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत असल्याने शासनाच्या पर्यावरणविषयक धोरणांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तोडलेल्या झाडांच्या बदल्यात नव्याने वृक्षलागवड व संगोपनाची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल पर्यावरणप्रेमींनी उपस्थित केला आहे.

वृक्षतोडीमुळे उष्णतेचे प्रमाण वाढण्याची तसेच पर्यावरणीय समतोल बिघडण्याची भीती पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे. भविष्यात या मार्गावर पुन्हा वृक्षलागवड होणार का, असा सवालही नागरिक उपस्थित करत आहेत.

# माणुसकीची भिंत मदत केंद्रात 'प्रबोधन दिन'

प्रतिनिधी १७ मे

**पुसद :** सप्त खंजिरी वादक तथा प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांचा वाढदिवस राज्यभर "प्रबोधन दिन" म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त पुसद येथील माणुसकीची भिंत मदत केंद्राच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

सत्यपाल महाराज हे मागील पन्नास वर्षांहून अधिक काळ कीर्तनाच्या माध्यमातून संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा प्रसार करत आहेत. अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, सामाजिक प्रबोधन तसेच अनिष्ट रूढी-परंपरांविरोधात त्यांनी सातत्याने जनजागृती केली आहे. प्रबोधन दिनानिमित्त माणुसकीची भिंत मदत केंद्राच्या वतीने गरजवंत नागरिकांसह उपजिल्हा रुग्णालयातील रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना फळे, बिस्किटे आणि भोजनाचे वाटप करण्यात आले.




या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाला पंकज पाल महाराज, स्वातीताई वाट, माणुसकीची भिंतचे अध्यक्ष गजानन जाधव, उपाध्यक्ष संतोष गावंडे, सचिव पंजाब ढेकळे यांच्यासह अनंता चतुर, मधुकर चव्हाण, दिगंबर देशमुख, आदित्य जाधव, गौरी जाधव, बद्री पाटील, राम गावंडे, दिनू राठोड, निरंजन मुडगुळे, गोविंदा वाघमोडे, बालाजी अंभोरे, स्वराज गावंडे, शिवम फाळके, प्रमोद ठाकूर, दीपक घाडगे आदी सदस्य उपस्थित होते.

सिटी न्यूज अमरावती

रविवार, दि. १७ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## स्वाधार योजनेतील त्रुटी पूर्ततेसाठी ३० मेपर्यंत संधी

**अमरावती:** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत (सन २०२५-२६) मधील अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटीअभावी परत करण्यात आले आहेत, त्यांच्यासाठी सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयात विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. पात्र विद्यार्थ्यांनी दि. १५ मे ते ३० मे २०२६ या कालावधीत आपल्या अर्जातील त्रुटी दूर करणे अनिवार्य आहे.

शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नसल्यास इयत्ता अकरावी, बारावी आणि पदवी, पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधांसाठी स्वाधार योजनेंतर्गत थेट आर्थिक मदत दिली जाते. मात्र, अनेक नवीन व नूतनीकरणाच्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे अपलोड केलेली नाहीत किंवा हार्डकॉपी सादर केलेली नाही.

# १५ व्या वित्त आयोगातून २६ ग्रामपंचायतींना ई-रिक्षा

◆ घनकचरा व्यवस्थापनाला मिळणार नवी गती, पालकमंत्र्यांच्या हस्ते हिरवी झेंडी

प्रतिनिधी १७ मे

**अमरावती:** जिल्हा परिषद, अमरावती अंतर्गत १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून अमरावती जिल्ह्यातील २६ ग्रामपंचायतींना घनकचरा व्यवस्थापनासाठी बॅटरी ऑपरेटेड ई-रिक्षांचे वाटप करण्यात येणार आहे. ग्रामीण स्वच्छता व्यवस्थेला अधिक बळकटी देण्यासाठी जिल्ह्यात आता बॅटरी संचालित घंटागाड्या धावणार आहेत.

आज जिल्हा परिषद येथे आयोजित कार्यक्रमात मा.ना. चंद्रशेखर बावनकुळे महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री अमरावती जिल्हा यांच्या हस्ते या वाहनांना हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करण्यात आला. यावेळी आमदार प्रवीण तायडे, प्रताप अडसड, संजय खोडके, राजेश वानखडे, केवलराम काळे, उमेश उर्फ चंदू यावलकर, रवी राणा, महापौर श्रीचंद तेजवानी, विभागीय आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, महानगर पालिका आयुक्त वर्षा लड्डा उपस्थित होते.



घराघरातून कचरा संकलन, त्याचे वर्गीकरण आणि शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेला या वाहनांमुळे गती मिळणार असून ग्रामीण स्वच्छतेसह पर्यावरण संवर्धनालाही चालना मिळणार आहे. पारंपरिक डिझेल वाहनांच्या तुलनेत ही ई-वाहने पर्यावरणपूरक असून इंधन खर्चातही बचत होणार आहे.

घनकचरा संकलन व व्यवस्थापन अधिक प्रभावी, शिस्तबद्ध आणि पर्यावरणपूरक पद्धतीने राबविण्यासाठी पंचायत विभागाच्या प्रशासकीय मान्यतेने ही वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. प्रत्येकी ३ लाख रुपये किंमतीच्या या वाहनांसाठी एकूण ७८ लाख रुपयांचा निधी १५ व्या वित्त आयोगातून उपलब्ध करून देण्यात आला आहे.

ही वाहने लवकरच संबंधित ग्रामपंचायतींच्या स्वाधीन करण्यात येणार असून त्याद्वारे स्वच्छ भारत मिशन अभियानाला नवी गती मिळणार आहे.

**या गावांचा समावेश:** अमरावती तालुक्यातील ब्राम्हणवाडा गोविंदपूर व लोणटेक, अचलपूर तालुक्यातील वडगाव फत्तेपूर व रासेगाव, अंजनगाव सुर्जी तालुक्यातील टाकरखेडा मोरे व खानमपूर पांढरी, भातकुली तालुक्यातील आसरा व टाकरखेडा शंभू, चांदूर बाजार तालुक्यातील कुर्हा, चांदूर रेल्वे तालुक्यातील आमला व कवठा कडू, दर्यापूर तालुक्यातील पिंपलोद व थिलोरी, मोर्शी तालुक्यातील शिरखेड व खानापूर, नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील वाढोणा रामनाथ व धानोरा गुरव, तिवसा तालुक्यातील शिरजगाव मो, वरुड तालुक्यातील हातुर्णा व शहापूर, धारणी तालुक्यातील हरिसाल व कुसुमकोट बु., धामणगाव रेल्वे तालुक्यातील अंजनसिंगी व वडगाव राजदी तसेच चिखलदरा तालुक्यातील टेंभूसोडा व काटकुंभ या ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

# रस्ते अपघातग्रस्तांसाठी 'पीएम राहत' योजना

◆ दीड लाखांपर्यंत मोफत उपचार मिळणार

प्रतिनिधी १७ मे

**अमरावती:** रस्ते अपघातातील जखमींना तातडीने आणि वेळेवर उपचार मिळावेत यासाठी केंद्र सरकारने 'पीएम राहत' ही योजना सुरू केली आहे. जिल्ह्यामध्ये या योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुरू झाली असून, अपघातग्रस्तांना आता दीड लाख रुपयांपर्यंत मोफत कॅशलेस उपचार मिळणार आहेत.

योजनेतून तात्काळ कॅशलेस उपचार केले जातील. यात अपघाताच्या तारखेपासून जास्तीत जास्त ७ दिवसांपर्यंत १.५ लाख रुपयांपर्यंतचे उपचार मोफत दिले जातील. अपघातानंतरचा पहिला तास अत्यंत महत्त्वाचा असतो. या काळात पैशांअभावी उपचार थांबू नये, यासाठी ही योजना राबविण्यात आहे. या योजनेच्या लाभासाठी कोणत्याही प्रकारच्या कागदपत्रांची सक्ती करण्यात आलेली नाही. यातील उपचारासाठी होणारा खर्च 'मोटार वाहन अपघात निधी' मधून केला जाणार आहे.



जिल्ह्यातील ४० आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत अंगीकृत असलेल्या रुग्णालयांमध्ये या योजनेचा लाभ घेता येईल. ही योजना यशस्वी करण्यासाठी रुग्णालय, पोलीस विभाग, राज्य आरोग्य संस्था आणि आपत्कालीन सेवा यांच्यात समन्वय साधण्यात आला आहे. गरजू नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनोद पवार यांनी केले आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून संत्रा बागेतील आधुनिक एआय तंत्रज्ञानाची पाहणी

प्रतिनिधी १७ मे

**अमरावती:** कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने आधुनिक संत्रा बाग व्यवस्थापनाला बळकटी देण्यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी मोर्शी तालुक्यातील एआय आधारित संत्रा प्रात्यक्षिक प्रकल्पाला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.त्यांनी सिट्रस इस्टेट उमरखेड अंतर्गत या नाविन्यपूर्ण प्रकल्पाची माहिती त्यांनी जाणून घेतली.

मोर्शी येथील प्रगतशील शेतकरी नवीन पेठे यांच्या शेतावर हा प्रयोग राबविला जात आहे. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी खालील तंत्रज्ञानाची सविस्तर माहिती घेतली. या प्रकल्पात एआय आणि आयओटी सेन्सर्सच्या मदतीने पिकांची रिअल-टाइम माहिती मिळवणे, उपग्रहाद्वारे पिकाच्या वाढीवर आणि ताणावर लक्ष ठेवणे, मातीतील ओलावा, खत व्यवस्थापन, पाण्याचे नियोजन आणि रोग-कीड नियंत्रणासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे, तज्ज्ञांचे मार्गदर्शनाचा समावेश आहे.

सिट्रस इस्टेटचे अध्यक्ष तथा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी राहुल सातपुते आणि 'मॅप माय क्रॉप' कंपनीच्या ॲग्रोनॉमिस्टनी सॅटेलाईट डेटाचा वापर दैनंदिन शेतीकामात कसा होऊ शकतो, याचे प्रात्यक्षिक दिले. यामुळे शेतकऱ्यांना योग्य वेळी अचूक निर्णय घेणे सुलभ होणार आहे.

बदलत्या हवामानात तंत्रज्ञान स्वीकारणे ही काळाची गरज असल्याचे मत जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी व्यक्त केले. आयओटी सेन्सर्समुळे खते आणि पाण्याचा कार्यक्षम वापर होऊन उत्पादन खर्च कमी होईल आणि संत्र्याचा दर्जा सुधारेल, अशी आशा त्यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी सिट्रस इस्टेटचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजय तळेगावकर, मोर्शीचे उपविभागीय अधिकारी प्रदिप पवार, तहसीलदार सागर ढवळे, तालुका कृषि अधिकारी प्रथमेश माने उपस्थित होते.

# नवीन घराचे बाधकामाच्या ठिकाणवरून इलेक्ट्रीक केबल चोरी करणाऱ्या अट्टल चोर ताब्यात

◆ शहर गुन्हे शाखेची कारवाई ◆ ४ चोरी व १ जबरी चोरी असे एकुण ०५ गुन्हे उघड करूण १,९२,०००/- रू माल जप्त

प्रतिनिधी १७ मे

**अमरावती:** नवीन घराचे बाधकामाच्या ठिकाणवरून इलेक्ट्रीक केबल चोरी करणाऱ्या अट्टल चोर ताब्यात घेतले.

शहर गुन्हे शाखेची कारवाई करून ४ चोरी व १ जबरी चोरी असे एकूण पाच गुन्हे उघडकीस आणले.

रेकॉर्ड वरील चोरीचे व घरफोडीचे गुन्हेगारांना चेक करून व त्यांचेवर पाळत ठेवुन योग्य प्रभावी कार्यवाही करण्याबाबत आदेश प्राप्त झाले वरून गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांचे नेतृत्वात पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.




पोलीस आयुक्तालय हद्दीत पो. स्टॉफसह रेकॉर्ड वरील चोरीचे व घरफोडीचे गुन्हेगार चेकिंग करीता पेट्रोलींग करीत असतांना. दिनांक १३/०५/२०२६ रोजी गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली कि, साहील राउत नावाचा इसम हा त्याचे साथीदारासह रेल्वे स्टेशन चौक येथे उभा आहे. त्याने बरेच ठिकाणी नवीन बाधकामाच्या ठिकाणचे इलेक्ट्रीक वायर चोरी केल्या आहेत. अशा माहीती वरून गुन्हे शाखेचे पथक यांनी रेल्वे स्टेशन चौक येथे जावुन सदर इसम हे नमुद माहीती प्रमाणे असल्याची खात्री झाल्याने त्या दोन्ही इसमास ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या इसमास त्यांचे ताब्यातील विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीचे उत्तरे दिली वरून दोन्ही इसमास त्याचे नांवगांव विचारले असता त्याने त्यांचे नांव साहील कैलास राउत वय २४ वर्ष रा. गांधी आश्रम सरकारी संडास जवळ. अमरावती असे सांगीतले व एक विधी संर्घषित बालक त्यांना विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी सांगितले की, त्यांनी अमरावती शरातील वेगवेगळया पोलीस स्टेशन हददी मधील नवीन बाधकामाच्या ठिकाणचे इलेक्ट्रीक वायर तसेच जबरी चोरी केल्याची कबुली दिल्यावरून त्यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन एकुण ०५ गुन्हयातील मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव साहील कैलास राउत वय २४ वर्ष रा. गांधी आश्रम सरकारी संडास जवळ. अमरावती, एक विधी संर्घषित बालक असे आहे. सदर ची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला अमरावती शहर, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे रमेश धुमाळ, सपोआ गुन्हे शाखा शिवाजी बचाटे, यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार-सुनिल लासुरकर, दिपक सुंदरकर, जहीर शेख, सचिन बहाडे, राजीक रायलीवाले यांनी केली आहे.

# महात्मा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त सेंद्रीय शेतीचा उपक्रम -पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

◆ कृषि निविष्ठा लिंकिंगवर कठोर कारवाई करणार

प्रतिनिधी १७ मे

**अमरावती:** रासायनिक शेतीकडून सेंद्रिय शेतीकडे शेतकऱ्यांना वळविण्यासाठी व्यापक मोहिम हाती घेण्यात येणार आहे. ही मोहिम महात्मा जोतिराव फुले यांच्या २००व्या जयंतीनिमित्त राबविण्यात येणार आहे. पहिल्या वर्षात सुमारे एक हजार हेक्टर सेंद्रिय शेतीखाली आणण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आली आहे. त्यामुळे जनमत तयार करण्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांनी व्यापक जनजागृतीची मोहिम हाती घ्यावी, असे आवाहन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.




पालकमंत्री बावनकुळे यांच्या उपस्थितीत आज जिल्हास्तरीय खरीप हंगाम २०२६ ची नियोजन बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. यावेळी कै. वसंतराव नाईक स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे, खासदार बळवंत वानखेडे, अमर काळे, विभागीय आयुक्त नयना गुंडे, आमदार संजय खोडके, रवी राणा, केवलराम काळे, प्रताप अडसड, प्रविण तायडे, राजेश वानखेडे, उमेश यावलकर, गजानन लवटे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मनपा आयुक्त वर्षा लड्डा, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, जिल्हा पोलिस अधीक्षक निकेतन कदम उपस्थित होते.

बावनकुळे यांनी, सेंद्रिय शेती ही काळाची गरज आहे. देशस्तरावर सेंद्रिय शेतीबाबत जनमत तयार करण्याची मोहिम हाती घेण्यात आली आहे. सुरवातीला उत्पादकता कमी होत असली तरी रासायनिक खतांचा खर्च कमी होत असल्याने आणि शेतमालाला चांगला भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे कृषि विभागाने कृषि सहायकापासून तालुका कृषि अधिकारी स्तरापर्यंत उद्दीष्ट देऊन जिल्ह्यात सेंद्रिय शेतीबाबत सकारात्मक वातावरण तयार करावे.

# वडाळी तलाव परिसराची संजय राठोड यांच्याकडून पाहणी

◆ वडाळी उद्यान परिसरात भव्य 'वंदनीय हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्मारक' उभारण्याबाबत चर्चा

प्रतिनिधी १७ मे

**अमरावती :** महाराष्ट्र राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी शनिवार दिनांक १६ मे २०२६ रोजी अमरावती येथील वडाळी तलाव परिसराची पाहणी करून परिसरातील विकास कामांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रस्तावित वंदनीय हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्मारकाच्या नियोजित स्थळालाही भेट देत संबंधित अधिकाऱ्यांसोबत सविस्तर चर्चा केली.

पाहणीदरम्यान संजय राठोड यांनी वडाळी उद्यान परिसरात भव्य, आकर्षक व दिमाखदार असे स्मारक उभारण्यात यावे, तसेच शहरातील मुख्य रस्त्यावरूनही सदर स्मारक स्पष्टपणे दिसेल, अशा प्रकारचा आराखडा तयार करण्यात यावा, असे निर्देश दिले. हे स्मारक अमरावती शहराची ओळख ठरणारे व नागरिकांसह पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र बनले पाहिजे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.



तसेच वडाळी तलाव परिसराचे सौंदर्यीकरण, पर्यटन विकास, प्रकाश व्यवस्था, नागरिकांसाठी सुविधा व स्मारक उभारणी संदर्भातील सर्व बाबींवर शासन स्तरावर लवकरच बैठक आयोजित करण्यात येणार असून संपूर्ण प्रस्ताव अंतिम करण्यात येईल, अशी माहिती त्यांनी दिली. संबंधित सर्व प्रक्रिया गतीने पूर्ण करून विकास कामांना चालना देण्याच्या सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी विविध मान्यवर पदाधिकारी, नगरसेवक, नगरसेविका तसेच संबंधित विभागातील अधिकारी उपस्थित होते. वडाळी तलाव परिसराच्या सर्वांगीण विकासाबाबत व स्मारकाच्या प्रस्तावित आराखड्याबाबत उपस्थितांमध्ये सकारात्मक चर्चा करण्यात आली.

# अमरावती जिल्ह्यात 'विशेष सखोल पुनरिक्षण' मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर

◆ २५.८१ लक्ष मतदारांच्या नोंदींची होणार घरोघरी जाऊन प्रत्यक्ष पडताळणी

प्रतिनिधी १७ मे

**अमरावती:** भारत निवडणूक आयोगाने देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये 'विशेष सखोल पुनरिक्षण' (एंिं) मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर केला असून, यामध्ये अमरावती जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे. या व्यापक मोहिमेअंतर्गत अमरावती जिल्ह्यातील सुमारे २५ लक्ष ८१ हजार ७२२ मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे. सध्या सुरू असलेल्या जनगणनेच्या कामाशी सांगड घालून क्षेत्रीय यंत्रणेचा विचार करून या तिसऱ्या टप्प्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले असून, जिल्ह्यातील ही प्रक्रिया जून महिन्यापासून सुरू होऊन ऑक्टोबर २०२६ मध्ये पूर्ण होणार आहे.

या मोहिमेची अंमलबजावणी अत्यंत व्यापक स्वरूपात केली जाणार असून, मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत (ँध्) प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन तपशिलाची खातरजमा केली जाईल. या प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता राखण्यासाठी राजकीय पक्षांतर्फे नेमण्यात आलेले 'बूथ लेव्हल एजंट्स' (ँं) त्यांना सहकार्य करणार आहेत.

जिल्ह्यात आजपर्यंत झालेल्या मतदार मॅपिंगच्या सद्यस्थितीचा विचार करता, ३६-धामणगाव रेल्वे मतदारसंघात ३ लक्ष १३ हजार ४२५ एकूण मतदारांपैकी २ लक्ष ९१ हजार ७८४ मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले असून २१ हजार ६४१ मतदारांचे मॅपिंग अपूर्ण आहे, ज्याची टक्केवारी ९३.१ इतकी आहे. ३७-बडनेरा मतदारसंघात ३ लक्ष ७८ हजार २९२ एकूण मतदारांपैकी ३ लक्ष १ हजार ५१७ मतदारांचे मॅपिंग पूर्ण व ७६ हजार ७७५ अपूर्ण असून टक्केवारी ७९.७ आहे. ३८-अमरावती मतदारसंघात ३ लक्ष ८३ हजार ४७१ एकूण मतदारांपैकी २ लक्ष ८२ हजार ४३७ मतदारांचे मॅपिंग पूर्ण व १ लक्ष १ हजार ३४ अपूर्ण असून टक्केवारी ७३.६५ आहे. ३९-तिवसा मतदारसंघात २ लक्ष ९९ हजार १४ एकूण मतदारांपैकी २ लक्ष ६२ हजार २९ मतदारांचे मॅपिंग पूर्ण व ३६ हजार ९८५ अपूर्ण असून टक्केवारी ८७.६३ आहे. ४०-दर्यापूर मतदारसंघात ३ लक्ष ७ हजार ८५१ एकूण मतदारांपैकी २ लक्ष ९० हजार ३७२ मतदारांचे मॅपिंग पूर्ण व १७ हजार ४७९ अपूर्ण असून टक्केवारी ९४.३२ आहे. ४१-मेळघाट मतदारसंघात ३ लक्ष ११ हजार ४७८ एकूण मतदारांपैकी २ लक्ष ७४ हजार ५८१ मतदारांचे मॅपिंग पूर्ण व ३६ हजार ८९७ अपूर्ण असून टक्केवारी ८८.१५ आहे. ४२-अचलपूर मतदारसंघात २ लक्ष ९५ हजार ८३६ एकूण मतदारांपैकी २ लक्ष ४८ हजार २१८ मतदारांचे मॅपिंग पूर्ण व ४७ हजार ६१८ अपूर्ण असून टक्केवारी ८३.९ आहे. तर ४३-मोर्शी मतदारसंघात २ लक्ष ९२ हजार ३५५ एकूण मतदारांपैकी २ लक्ष ६० हजार ३७५ मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले असून ३१ हजार ९८० मतदारांचे मॅपिंग अपूर्ण आहे आणि येथील टक्केवारी ८९.०६ आहे. अशाप्रकारे संपूर्ण जिल्ह्यात एकूण २५ लक्ष ८१ हजार ७२२ मतदारांपैकी २२ लक्ष ११ हजार ३१३ मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले असून ३ लक्ष ७० हजार ४०९ मतदारांचे मॅपिंग अपूर्ण आहे, ज्याची एकूण सरासरी टक्केवारी ८५.६५ इतकी आहे.

जिल्हा प्रशासनाने या मोहिमेचे वेळापत्रक प्रसिद्ध केले असून, त्यानुसार दिनांक २० ते २९ जून २०२६ या कालावधीत सर्व बीएलओ यांना प्रशिक्षण आणि पूर्वतयारी करून दिली जाईल. त्यानंतर ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत निवडणूक यंत्रणा प्रत्यक्ष घरोघरी जाऊन मतदारांच्या भेटी घेईल. या पडताळणीनंतर ५ ऑगस्ट २०२६ रोजी मसुदा मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. नागरिकांना ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत आपल्या दावे व हरकती नोंदवता येतील. सर्व दावे व हरकतींचा निपटारा केल्यानंतर शेवटी ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल.

माहितीची अचूकता आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी आशिष येरेकर यांनी सर्व राजकीय पक्षांना प्रत्येक मतदान केंद्रावर आपले अधिकृत एजंट (ँं) नियुक्त करण्याचे जाहीर आवाहन केले आहे. यामुळे मतदार यादीतून दुबार नावे तसेच मृत व्यक्तींची नावे काढणे आणि नवीन पात्र मतदारांची नोंदणी करणे ही प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि अचूक होण्यास मदत होणार आहे, असे उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांनी कळविले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

रविवार, दि. १७ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# फोकस

● अतिश देशमुख @ वाशीम ●




●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

आकांक्षीत जिल्हा म्हणून वाशीम जिल्ह्याची नोंद आहे. सिंचनाचा अनुशेष देखील मोठ्या प्रमाणात आहे. नविन मोठेएकही प्रकल्प जिल्हयात आला नाही. शिवाय प्रकल्प आणण्यासाठी एकाही लोकप्रतिनिधीनी पुढाकार घेतला नाही. यावर कळस म्हणजे सिंचन विभागाला भ्रष्टाचाराने बरबटले असतांना सरकारने जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय शेगाव येथे स्थलांतरित करून जिल्ह्यावर अन्याय केला आहे. तर अतिवृष्टीमुळे शेतीतील पिकेच नव्हे तर संपूर्ण नदी व नाल्याकाठची शेतीतील माती खरडून गेली. शेतीच नष्ट झाली. सुरूवातीला अतिवृष्टीच्या मदतीतून जिल्हा वगळला नंतर समाविष्ट केला. तरी सुध्दा अद्यापही बळीराजा मदतीच्या प्रतिक्षेतच आहे. नदी जोड प्रकल्पातून वाशीम जिल्ह्याला वगळले असून अद्यापही नदी जोड प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश झाला नाही. अमरावती विद्यापिठाचे उपकेंद्र वाशीमला व्हावे यासाठी ३० वर्षापासून सामाजिक संघटनेसह राजकारण्यांनी पुढाकार घेतला होता. त्याचेही प्रयत्न असफल झाले. आता विद्यापीठ उपकेंद्र अकोलाला होणार असल्याचे जाहीर झाल्याने आपले लोकप्रतिनिधी किती निष्क्रीय आहे हे सिध्द झाले. शहरातून जाणारा अकोला - नांदेड रस्ता चौपदरी ऐवजी दुपदरीच होत आहे. जिल्ह्यात एमआयडीसी भकास झाली असून मुलभूत सुविधांचा अभाव आहे. जिल्ह्यातील शहरासह ग्रामीण भागातील रस्ते खड्ड्यात गेले आहेत. योजना खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचल्याच नाहीत. त्यामुळे जिल्ह्याचा आकांक्षीत जिल्हा म्हणून असलेला कलंक पुसण्यासाठी आलेला निधीही भ्रष्टअधिकाऱ्यांमुळेच खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतच नाही. अर्थसंकल्प अधिवेशनातही जिल्ह्याला काहीच मिळाले नाही. लोकप्रतिनिधींनीही काहीच केले नाही .

# कधी मिळणार न्याय जिल्ह्यावर अन्याय !



* रस्ता चौपदरी नव्हे तर होतोय दुपदरी
* भ्रष्टाचार निरंतर, पाटबंधारे मंडळाचे स्थलांतर
* अमरावती विद्यापिठ उपकेंद्राची लढाई व्यर्थ
* नदीजोड प्रकल्पातून वाशीम जिल्हा वगळला







आकांक्षीत जिल्हा म्हणून ओळख असलेल्या वाशिम जिल्ह्याच्या पदरी पुन्हा एकदा निराशाच आली असून वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पातून वाशिम जिल्हा वगळण्यात आला आहे. त्यामुळे सिंचनाचा अनुशेष भरून निघण्याची शेतकऱ्यांची आशा मावळली आहे. कारण अधिवेशनातही बैठक आणि चर्चा घेवून कोणताही ठोस निर्णय झाला नाही. नदी जोड प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश झाल्याचे पोस्टर लावून चमकोगिरी करणारे नेते मात्र आता तोंडघशी पडले असून जिल्ह्यातील राजकारण्यांची निष्क्रियता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प हा राज्यस्तरीय नदीजोड प्रकल्प प्रस्तावित असून या प्रकल्पाव्दारे वैनगंगा नदीवरील भंडारा जिल्हयातील गोसीखुर्द प्रकल्पात पावसाळ्यात उपलब्ध होणारे पाणी वैनगंगा उपखोऱ्यातून पुर्णा-तापी खोऱ्यातील बुलढाणा जिल्हयातील नळगंगा प्रकल्पापर्यंत नदीजोड कालव्याद्वारे वळविणे प्रस्तावित आहे. या कालव्याव्दारे विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा ह्या सहा जिल्ह्यातील १५ तालुक्यातल्या एकूण ३७१२७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्पाची जलसंपदा विभागाच्या सन २०२२-२३ च्या दरसूचीनुसार प्रकल्पाची किंमत रु.८८,५७५ कोटी इतकी आहे. पूर्वी या प्रकल्पात वाशिम जिल्ह्याचाही समावेश नव्हता आता मुख्यमंत्री दुसऱ्या टप्प्यात वाशीम जिल्ह्याचा समावेश करण्याचे आश्वासन २८ नोव्हेंबरच्या सभेत दिले यावरून जिल्ह्याचा नदीजोड प्रकल्पात समावेश नव्हता हे सिध्द झाले आहेत. आताही अधिवेशनात बैठकीचे सत्र सुरू असून आकांक्षीत जिल्ह्याला फक्त बैठका व आश्वासनावरच ठेवले आहे. जिल्ह्याकडे पुर्णपणे दुर्लक्ष केले आहे.विदर्भातील हिवाळी अधिवेशनात जिल्ह्याच्या विविध प्रश्नांवर चर्चा होवून निर्णय होतील अशी अपेक्षा होती. मात्र, अधिवेशनात जिल्ह्याला कोणताच मोठा फायदा झाला नाही. कुठल्या प्रकारचे ठोस निर्णय न झाल्याने आकांक्षीत जिल्ह्याला दुर्लक्षीत करत उपेक्षीत ठेवण्यात आले आहे. आकांक्षीत जिल्हा म्हणून सर्वप्रथम वाशीम जिल्ह्याचा विकासाच्या दृष्टीने विचार व्हावा यासाठी जिल्ह्यातील नेत्यांनी पुढे येणे गरजेचे आहे. निव्वळ पत्र आणि आश्वासन देवून आशेवर ठेवणे म्हणूजेच जिल्हा वासियांची फसवणूक करणे आहे. आजपर्यंत कोणतेच मोठे प्रकल्प आले नाहीत. आले तर ते होवू दिले नाहीत. जे जिल्ह्यात आहे ते इतर जिल्ह्यात नेल्या जात आहे. रस्तेही भ्रष्टाचाराने खड्ड्यात गेले आहेत.







# जिल्ह्यात भ्रष्टाचार निरंतर, पाटबंधारे मंडळाचे स्थलांतर...

मागास जिल्हा म्हणून वाशीम जिल्ह्याची नोंद आहे. सिंचनाचा अनुशेष देखील मोठ्या प्रमाणात आहे. नविन मोठेएकही प्रकल्प जिल्हयात आला नाही. शिवाय प्रकल्प आणण्यासाठी एकाही लोकप्रतिनिधीनी पुढाकार घेतला नाही. यावर कळस म्हणजे सिंचन विभागाला भ्रष्टाचाराने बरबटले असतांना सरकारने जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय शेगाव येथे स्थलांतरित करून जिल्ह्यावर अन्याय केला आहे. याविरोधात जिल्ह्यातील आमदार, खासदार व पुढाऱ्यांनी दिखावा म्हणुन तीव्र विरोध केला. तरीही, २७ ऑक्टोंबर २०२३ रोजी मंडळ कार्यालयाचे शेगाव येथे उद्घाटन संपन्न झाले. आता साप गेल्या नंतर काडया मारण्यात काय अर्थ अशी चर्चा होत आहे. खुदद नितिन गडकरींनीही जिल्हयातील अधिका-यांच्या लक्ष्मी दर्शनाच्या लालसेमुळे व लोकप्रतिनिधीच्या निष्कीये ते मुळे अनेक प्रकल्प रखडल्याचे एक दोन वेळा नव्हे तर तीन वेळा जाहिर सभेत म्हटले आहे.

जिल्ह्यातील पाणी टंचाई व दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन सन २००८ मध्ये वाशीम जिल्ह्यात मंडळ कार्यालयाची स्थापना करण्यात आली होती. त्यामुळे सिंचन क्षमता वाढीस मदत झाली. परंतु महाराष्ट्र शासन जल संपदा विभागाने २३ ऑक्टोंबर रोजी शासन निर्णय काढून मंडळ कार्यालय स्थलांतर करण्याचा निर्णय घेतला. ही बाब मागास आणि अकांक्षीत असलेल्या वाशीम जिल्ह्यासाठी अन्यायकारक असून आमदार, खासदार आजी माजी हे नेते पुढे आले. त्यांनी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्र्यांकडे वरिष्ठ स्तरावर प्रयत्न करणार असल्याचे माध्यमांना सांगितले होते. त्यांचे प्रयत्न व्यर्थ गेले. तरी देखील जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव येथे स्थलांतरित करण्यात आले. २७ ऑक्टोंबर २०२३ रोजी मंडळ कार्यालयाचे रीतसर उद्घाटन करण्यात आले. यामुळे सरकार विरोधात जिल्ह्यात तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. कार्यालय स्थलांतर होत असतांना निव्वळ दिखावा म्हणुन मागणी करतांना लोकप्रतिनिधी पुढाकार घेतात. मात्र जिल्हयात नविन मोठे प्रकल्प आणुन विकासाचा मार्ग काढतांना दिसत नाही. तर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधीसह सामाजिक संघटनाही तात्पूर्ते आंदोलन करून विरोध दर्शविला. मात्र, त्यामधून काही मार्ग निघाला नाही.




# सिंचनाचा भ्रष्टाचार निवळला, नदीजोड प्रकल्पातून जिल्हा वगळला...




आकांक्षीत जिल्हा म्हणून ओळख असलेल्या वाशिम जिल्ह्याच्या पदरी पुन्हा एकदा निराशाच आली असून वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पातून वाशिम जिल्हा वगळण्यात आला आहे. त्यामुळे सिंचनाचा अनुशेष भरून निघण्याची शेतकऱ्यांची आशा मावळली आहे. नदी जोड प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश झाल्याचे पोस्टर लावून चमकोगिरी करणारे नेते मात्र आता तोंडघशी पडले असून जिल्ह्यातील राजकारण्यांची निष्क्रियता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प हा राज्यस्तरीय नदीजोड प्रकल्प प्रस्तावित असून या प्रकल्पाव्दारे वैनगंगा नदीवरील भंडारा जिल्हयातील गोसीखुर्द



प्रकल्पात पावसाळ्यात उपलब्ध होणारे पाणी वैनगंगा उपखोऱ्यातून पुर्णा-तापी खोऱ्यातील बुलढाणा जिल्हयातील नळगंगा प्रकल्पापर्यंत नदीजोड कालव्याद्वारे वळविणे प्रस्तावित आहे. या कालव्याव्दारे विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा ह्या सहा जिल्ह्यातील १५ तालुक्यातल्या एकूण ३७१२७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्पाची जलसंपदा विभागाच्या सन २०२२-२३ च्या दरसूचीनुसार प्रकल्पाची किंमत रु.८८,५७५ कोटी इतकी आहे. पूर्वी या प्रकल्पात वाशिम जिल्ह्याचाही समावेश होता मात्र, ६ फेब्रुवारी रोजी राज्य सरकारने काढलेल्या शासन निर्णयात वाशिम जिल्ह्याचा उल्लेख नाही. त्यामुळे आकांक्षीत जिल्ह्याचा डाग पुसण्याच्या बाता करणाऱ्या लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

तरीही, २७ ऑक्टोंबर २०२३ रोजी मंडळ कार्यालयाचे शेगाव येथे गेले.




## अमरावती विद्यापिठ उपकेंद्राचे भिजत घोंगडे कायम...

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा कलम ५ (८)अंतर्गत प्रत्येक विद्यापीठाने आपल्या शैक्षणिक नियोजनासाठी उपकेंद्र उभारणे बंधनकार आहे. मात्र, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेला ३९ वर्षे होऊनसुद्धा विद्यापीठ प्रशासनाने आपले उपकेंद्र सुरू केले नाही. दरम्यान, वाशीम येथे उपकेंद्र व्हावे, असा धोरणात्मक निर्णय विद्यापीठाच्या सिनेट सभेमध्ये झाला होता. त्याला उच्च व तंत्र शिक्षण विभागानेसुद्धा तत्वतः मान्यतही दिली होती.लोकप्रतिनिधींनी या संबंधि पुढाकारही घेतला होता.मात्र घोडे कुठे आडले तरी सुध्दा उपकेंद्राचा प्रश्न अद्यापही कायमच आहे.लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी उपकेंद्रासाठी उभी केलेली चळवळ थंडबस्त्यात पडली आहे.




## वाशीम येथे विद्यापिठ उपकेंद्राला तत्वता मान्यता मिळाली होती...

वाशीम येथे उपकेंद्र व्हावे, याला उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून १ सप्टेंबर २०१० रोजी झालेल्या बैठकीत तत्वतः मान्यता देण्यात आली होती. शिवाय उपकेंद्रासाठी १७ कर्मचाऱ्यांची आवश्यकता असून, ६० कोटींचा खर्च अपेक्षित आहे हे सुद्धा यात ठरले. हा प्रस्ताव वित्त व संबंधित विभागाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला. १५ वर्षांपासून तो रेंगाळला आहे. दरम्यान, बांधकामाच्या साहित्याचे भाव आणि कर्मचाऱ्यांचे पगारही वाढले. त्यामुळे आता हा खर्च ३०० कोटींपेक्षाही अधिक होणार आहे. त्यामुळे हा प्रस्ताव रखडला आहे. तर दुसरीकडे विद्यापिठ उपकेंद्र अकोल्याला होणार असल्याने पुन्हा एकदा वाशीम जिल्ह्यावर अन्याय झाला आहे. तरी सुध्दा उपकेंद्रासाठी लढणाऱ्या लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटना निद्रावस्थेत असून त्यांना जिल्ह्याच्या विकासाचे काहीच घेणे देणे नसल्याचे पुन्हा एकदा सिध्द होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
रविवार, दि. १७ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## शेतीच्या वादातून मारहाण; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**मलकापूर:** तालुक्यातील नरवेल येथे शेतीच्या वादातून एकास मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना दि. १४ मे रोजी दुपारी घडली. याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी तिघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. याबाबत दीपक गजानन कोथळकर (३५, रा. नरवेल) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. १४ मे रोजी दुपारी अडीच वाजताच्या सुमारास शेतीच्या वादातून सागर कोथळकर याने शिवीगाळ केली. त्यानंतर त्याच्या दोन भावांनी दीपक कोथळकर यांना मारहाण केली. यातील एकाने कुऱ्हाडीच्या दांड्याने हल्ला केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या मारहाणीत दीपक कोथळकर जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी बुलढाणा येथे हलविण्यात आले. तेथे बिट अंमलदार राजेश बावणे यांनी जखमीचा जबाब नोंदविला. याप्रकरणी पोलिसांनी विलास कोथळकर, अमोल कोथळकर व सागर कोथळकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# यंदाच्या खरीप हंगामात सोयाबीन क्षेत्र वाढण्याची शक्यता

प्रतिनिधी १७ मे

**खामगाव:** मागील काही दिवसांपासून सोयाबीनच्या बाजारभावात झालेल्या वाढीमुळे आगामी खरीप हंगामात जिल्ह्यात सोयाबीन लागवडीचे क्षेत्र वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. चांगला दर मिळत असल्याने अनेक शेतकरी यंदा सोयाबीन पिकाकडे वळण्याचे नियोजन करत असल्याचे चित्र आहे.

गेल्या हंगामात कमी दरामुळे नाराज असलेल्या शेतकऱ्यांना यंदा बाजारातील तेजीमुळे काहीसा दिलासा मिळाला आहे. बाजारात सोयाबीनला समाधानकारक दर मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नव्याने उत्साह निर्माण झाला आहे.

परिणामी, खरीप हंगामासाठी बियाणे, खते आणि इतर कृषी साहित्याच्या खरेदीसाठी शेतकऱ्यांनी तयारी सुरू केली आहे.

### दरवाढीमुळे सोयाबीन पिकाकडे कल



**काही शेतकरी पीक पद्धतीत बदलाच्या तयारीत**

जिल्ह्यात कापूस, तूर आणि इतर पारंपरिक पिकांसोबत मोठ्या प्रमाणात सोयाबीनची लागवड केली जाते. मात्र, यंदा दरवाढीचा परिणाम लागवड क्षेत्रावर होण्याची शक्यता कृषी क्षेत्रातील जाणकार व्यक्त करत आहेत. काही शेतकरी उत्पादन खर्च, बाजारातील मागणी आणि हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन पीक पद्धतीत बदल करण्याच्या तयारीत असल्याचेही सांगितले जात आहे. योग्य नियोजन आणि अनुकूल हवामान मिळाल्यास यंदा जिल्ह्यात सोयाबीनचे उत्पादन वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## पेट्रोल-डिझेल टंचाई? पंपांवर वाहनांच्या रांगा!

### ◆पेट्रोल-डिझेलचा रात्री पुरवठा आणि काही तासांत इंधन 'नो स्टॉक'

प्रतिनिधी १७ मे

**बुलढाणा:** जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅस सिलिंडरच्या उपलब्धतेबाबत अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. लॉकडाऊन लागू होणार, इंधन पुरवठा बंद होणार, अशा अफवा वेगाने पसरल्यानंतर अनेक नागरिकांनी पेट्रोलपंप आणि गॅस एजन्सीकडे धाव घेतली आहे. परिणामी, शनिवारी शहरातील पेट्रोलपंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा दिसून आल्या. काही नागरिकांनी कॅन, ड्रम आणि बाटल्यांमध्ये पेट्रोल-डिझेलचा अतिरिक्त साठा करण्यास सुरुवात केल्याचे दिसून आले. खरीप हंगामाच्या पूर्वतयारीला वेग आल्याने ग्रामीण भागात डिझेलची मागणीही अचानक वाढली आहे.



पेरणीपूर्व मशागत, नांगरणी आणि वखरणीसाठी ट्रॅक्टरमध्ये इंधन भरण्यासाठी शेतकरी मोठ्या प्रमाणात पेट्रोलपंपांवर गर्दी करत असल्याचे चित्र आहे. इंधन वेळेवर उपलब्ध होईल की नाही, या भीतीपोटी अनेक शेतकरी ट्रॅक्टरच्या टाक्या पूर्ण भरून घेत असून, अतिरिक्त डिझेल कॅन, ड्रम आणि प्लास्टिकच्या डब्यांमध्ये साठवून नेत असल्याचे दिसून येत आहे. काही भागांत पेट्रोलपंपांवर 'स्टॉक संपला' किंवा 'मर्यादित इंधन उपलब्ध' असे फलक झळकू लागल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण अधिक गडद झाले आहे.

# जन्म-मृत्यू नोंदणीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढा!'

### शेगाव बार असोसिएशनचे तहसीलदारांना निवेदन

प्रतिनिधी १७ मे

**शेगाव:** तहसील कार्यालयात प्रलंबित असलेल्या जन्म-मृत्यू नोंदणीच्या प्रकरणांचा तातडीने निपटारा करावा, अशी मागणी शेगाव बार असोसिएशनने तहसीलदारांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. प्रकरणे निकाली निघण्यास होत असलेल्या विलंबामुळे नागरिकांसह विद्यार्थ्यांनाही अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात सांगितले.

जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियमांतर्गत दाखल होणाऱ्या अनेक प्रकरणांवर शासनाच्या नव्या नियमांनुसार प्रक्रिया सुरू असली, तरी प्रत्यक्षात अंतिम आदेशासाठी मोठा कालावधी लागत असल्याचे निवेदनात सांगितले. या निवेदनावर बार असोसिएशनचे अध्यक्ष . दामोदर पिसे, सचिव . किशोर चोपडे, सी. व्ही. देशमुख, एम. एम. मल, सूर्यपुत्र इंगळे, संदेश वानखडे, पंकज शेगावकर, शेख इमरान, प्रकाश कलतारी, चेतन देशमुख, विनोद पहुरकर, शुभम मसने, अलीम खान, सूरज कहार आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**'अध्यादेश काढावा!'**

जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियमात आवश्यक दुरुस्ती करून प्रलंबित प्रकरणे न्यायालयाकडे वर्ग करण्याबाबत शासनाने अध्यादेश काढावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. प्रशासनाला सहकार्य करण्यास बार असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य तयार असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

# अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा स्थापनेचा तिढा अखेर सुटला!

प्रतिनिधी १७ मे

खामगाव: शहरात गेल्या काही दिवसांपासून गाजत असलेल्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळा स्थापनेच्या प्रश्नावर अखेर तोडगा निघाला असून, उपोषणकर्ते व प्रशासनात सकारात्मक सहमती झाल्याने सुरू असलेले साखळी उपोषण मागे घेण्यात आले आहे. उपविभागीय अधिकारी कार्यालयात शनिवार, १६ मे रोजी झालेल्या विशेष बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा पुतळा उभारण्याच्या मागणीसाठी दिवसांपासून काही साखळी उपोषण सुरू होते. या पार्श्वभूमीवर कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या सूचनेनुसार व त्यांच्या प्रमुख उपस्थितीत उपविभागीय अधिकाऱ्यांच्या दालनात विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील, मुख्याधिकारी डॉ. प्रशांत शेळके, तहसीलदार सुनील पाटील, पोलिस निरीक्षक रामकृष्ण पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एकनाथ तळेले, कनिष्ठ अभियंता मयूर मसने, नगरपालिका बांधकाम अभियंता पी. बी. लबडे, अभियंता राजेंद्र मस्के,नायब तहसीलदार विजय पाटील, भूमिअभिलेख विभागाचे जे. एस. शिंदे, एस. एच. टिकार, उपमुख्याधिकारी आनंद देवकते, घुगे, प्रफुल्ल पोटदुखे आदी उपस्थित होते. यावेळी तोडगा काढण्यासाठी उपोषणकर्त्यांनी पर्यायी जागेचा प्रस्ताव मांडला. नगरपरिषद नाट्यगृहाच्या दक्षिणेकडील भागात, नगरपरिषद लगतच्या बाजूस पुतळ्यासाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. या प्रस्तावावर चर्चा झाल्यानंतर उपोषणकर्त्यांनी या जागेस मान्यता दिली. त्यानंतर प्रशासनानेही या जागेबाबत तत्त्वतः मान्यता दिली.

**पुतळा समिती स्थापन करण्याच्या सूचना**

शासनाच्या विद्यमान परिपत्रकानुसार पुढील सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी स्वतंत्र पुतळा समिती स्थापन करण्याच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या.

रेल्वे स्टेशनच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील विद्यमान पुतळा सन्मानपूर्वक हटवून घेण्याबाबतही एकमताने निर्णय घेण्यात आला.

## लाखनवाडा येथे समाधान शिबिराला प्रतिसाद

### नागरिकांना विविध दाखल्यांचे वितरण

प्रतिनिधी १७ मे

**खामगाव:** लाखनवाडा येथील लष्करिया नूरबबानो नॅशनल उर्दू हायस्कूलच्या प्रांगणात दि. १५ मे रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल राजस्व अभियान' अंतर्गत समाधान शिबिर उत्साहात पार पडले. शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात विविध दाखल्यांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच विविध विभागांच्या स्टॉलद्वारे नागरिकांना योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली.

शिबिराच्या अध्यक्षस्थानी प्रशासक सुरेखा पांढरे होत्या. व्यासपीठावर नायब तहसीलदार सोनाली भाजीभाकरे, निखिल पाटील, पुरवठा अधिकारी फुलझेले, गणी गाजी, माजी रामेश्वर बंड आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी आरोग्य विभागाचे डॉ. गफरान खान, सहायक कृषी अधिकारी ढोरे तसेच नायब तहसीलदार भाजीभाकरे व पाटील यांनी विविध योजनांबाबत मार्गदर्शन केले. संचालन मंडळ अधिकारी दीक्षित यांनी केले, तर आभार प्रदर्शन ग्राम महसूल अधिकारी एन. डी. मोठे यांनी मानले. यावेळी मंडळ अधिकारी अशोक सोनोने, काळवाघे, पद्मने, विटेवार, ग्राम महसूल अधिकारी पी. जी. शिंदे, व्ही. एस. गुंजकर, डी. व्ही. गायकवाड, बी. यू, मोरे, एस. पी. नगराळे उपस्थित होते.

## किनगाव पोलिसांनी रोखला १४ वर्षीय बालिकेचा विवाह

प्रतिनिधी १७ मे

**बुलढाणा :** किनगाव राजा पोलिस स्टेशन हद्दीत वर्दडी शिवारात एका १४ वर्षीय मुलीचा बालविवाह होणार असल्याची माहिती १५ मे रोजी पोलिसांना डायल ११२ वर मिळाली होती. ठाणेदार संजय मातोंडकर यांनी पथकासह घटनास्थळी पोहचून बालविवाह रोखला. किनगाव राजा पोलिस स्टेशन येथे डायल ११२ वर पोलिसांना पोलिस स्टेशन हद्दीतील ग्राम वर्दडी ता. सिंदखेड राजा शिवारात एका १४ वर्षीय मुलीचा बालविवाह होणार असल्याची माहिती मिळाली. ठाणेदार संजय मातोंडकर व त्यांच्या पोलिस टीमने गावात जावून माहिती घेतली असता त्यामध्ये सत्यता आढळून आली. तसेच जे विवाहमध्ये सहभागी होते, त्यांना बालविवाह करण्यापासून परावृत्त करण्यासाठी लेखी नोटीसी देवून घटनेवर दिवसभर बारकाईने लक्ष ठेवून होणारा बालविवाह रोखण्यात आला. सदर कार्यवाही पोलिस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलिस अधीक्षक अमोल गायकवाड, मेहकर उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली किनगाव राजा पोस्टे. चे ठाणेदार संजय मातोंडकर व मपोहेकॉ. सोनल पोहेकॉ. अतिश सवडे, पोकॉ. संदीप डोंगरे, पोकॉ. सोनपसारे, सुभाष गिते, शरद म्हस्के यांनी पार पाडली. बालविवाह रोखण्याबाबत ठाणेदार संजय मातोंडकर यांनी जनजागृती करीत बालविवाह सारख्या घटनेत तत्परता दाखवून बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यास तत्काळ पोलिस स्टेशन किनगाव राजा येथे कळविण्याचे जनतेला आवाहन केले आहे.

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात बुलढाणा जिल्ह्याची उल्लेखनीय कामगिरी

प्रतिनिधी १७ मे

**बुलढाणा :** मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, बुलढाणा जिल्हा कार्यालयाने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी करत महाराष्ट्रात द्वितीय तर विदर्भात प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात जिल्ह्यास ३१२ भौतिक प्रस्तावांचा लक्षांक प्राप्त झाला होता. ग्रामीण भागात उद्योगांना चालना देऊन रोजगारनिर्मिती करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, बुलढाणा कार्यालयामार्फत तब्बल १ हजार ०५२ उद्योजकांचे प्रस्ताव टास्क विविध बँकांकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आले होते. मंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा तसेच अधिकाऱ्यांच्या सहकार्यामुळे ३३८ प्रस्तावांना बँकांकडून मंजुरी मिळाली असून, यामध्ये एकूण ६८४.२३ लाख रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले आहे. त्यामुळे योजनेच्या १०८ टक्के उद्दिष्टपूर्तीची नोंद झाली आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील ५५६ व्यक्तींना रोजगार उपलब्ध झाला आहे. या यशामागे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी संजय मोहनराव इंगळे यांचे योग्य नियोजन व प्रभावी मार्गदर्शन महत्त्वाचे ठरल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातही मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घेऊन युवकांनी उद्योग उभारणीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, बुलढाणा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## शेगावात अल्पवयीन मुलीचा विनयभंग

### युवकावर पोक्सो कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल

प्रतिनिधी १७ मे

**शेगांव:** क्लास संपल्यानंतर घरी परतत असलेल्या अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिचा विनयभंग केल्याप्रकरणी शेगाव शहर पोलिसांनी १६ मे रोजी एका युवकाविरुद्ध पॉक्सो कायद्यासह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीने पीडितेला, तसेच तिच्या भावाला जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १७ वर्षीय पीडित मुलगी क्लास आटोपून घरी परतत असताना आरोपी पलाश संजय देशमुख (२४) याने तिचा पाठलाग केला. दि. १५ मे रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास आरोपीने तिला अडवून आवाज दिला. त्यानंतर, वाईट उद्देशाने तिचा हात धरत त्रास दिल्याचा आरोप आहे. पीडितेने विरोध केल्यानंतर आरोपीने जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी पीडितेने दि. १६ मे रोजी मध्यरात्री शेगाव शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली.

# गॅस कटरने एटीएम फोडले; ७ लाख लंपास

प्रतिनिधी १७ मे

**मोताळा:** तालुक्यातील मोताळा-बुलडाणा मार्गावरील तहसील चौकाजवळील स्टेट बँक ऑफ इंडियाचे एटीएम चोरट्यांनी गॅस कटरच्या सहाय्याने फोडून ६ लाख ९७हजार ४०० रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना शनिवारी (१६ मे) पहाटे सव्वाचारच्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी बोराखेडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी एटीएममध्ये प्रवेश करून सर्वप्रथम कॅमेऱ्यावर स्प्रे मारून सीसीटीव्ही यंत्रणा निष्क्रिय करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर गॅस कटरच्या सहाय्याने एटीएम मशीन फोडून आत ठेवलेली रोकड चोरट्यांनी लंपास केली.

एटीएममधील सेन्सर प्रणालीमुळे दिल्लीतील नोएडा येथील सुरक्षा नियंत्रण कक्षाला अलर्ट मिळताच त्यांनी तत्काळ बोराखेडी पोलिसांशी संपर्क साधला; मात्र तोपर्यंत चोरटे रोकड घेऊन पसार झाले होते. ठाणेदार सिताराम मेहेत्रे यांनी गस्तीवरील पोलिस पथकाला तातडीने घटनास्थळी रवाना केले; मात्र पोलिस पोहोचण्यापूर्वीच चोरट्यांनी पलायन केले होते. घटनास्थळी जिल्हा पोलिस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर पोलिस अधीक्षक गायकवाड, उपविभागीय पोलिस अधिकारी सुधीर पाटील यांनी घटनास्थळी भेट दिली.



## जीव अन् खर्चही वाचला, सात ठिकाणी मोफत डायलिसिस!

### आता तालुक्याच्या ठिकाणीही सुविधा: ग्रामीण भागातील रुग्णांना मिळाला दिलासा

प्रतिनिधी १७ मे

**खामगाव:** किडनी विकाराने त्रस्त रुग्णांसाठी जीवनदायी महाडायलिसिस योजना जिल्ह्यात राबविली जात आहे. या योजनेंतर्गत सरकारी रुग्णालयांमध्ये मोफत डायलिसिस उपचार दिले जात आहेत. त्यामुळे गोरगरीब रुग्णांना दिलासा मिळाला आहे. जिल्ह्यात सात ठिकाणी डायलिसिस सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दररोज या ठिकाणी शेकडो रुग्णांना या सुविधेचा लाभ मिळत आहे.

जिल्हा सामान्य रुग्णालय, खामगाव, शेगाव, मलकापूर, चिखली, जळगाव जामोद येथे सध्या नियमितपणे ही सेवा सुरू आहे. त्यामुळे शहरी भागासह ग्रामीण भागातील शेकडो गोरगरीब रुग्णांना मोफत उपचार उपलब्ध झाले आहेत. ग्रामीण भागातील किडनी विकाराच्या रुग्णांना उपचारासाठी आता शहरी भागात जाण्याची आवश्यकता नाही. तालुक्याच्या ठिकाणी ही सेवा मिळत असल्याने या रुग्णांची मोठी गैरसोय दूर झाली आहे. किडनी विकाराच्या रुग्णांसाठी डायलिसिस उपचार जीवनदायी ठरतात.बुलढाण्यात मार्च २०२६ पर्यंत ७केंद्रांवर ५० यंत्रांद्वारे २६,९१३ वेळा ही सेवा देण्यात आली.

सात ठिकाणी डायलिसिस सुविधा सुरू झाल्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना या सुविधेचा मोठा लाभ होत आहे. शिवाय डायलिसिस करण्यासाठी आता जिल्ह्याच्या ठिकाणी येण्याची आवश्यकता नाही.

**१८८१ डायलिसिस सत्रे !**

या कालावधीत १८८१ डायलिसिस सत्रे पार पडली. आतापर्यंत एकूण २६,९१३ डायलिसिस सत्रे यशस्वीरित्या पूर्ण झाली आहेत. लोणारात २१ लाभार्थी असून मासिक १४४ सत्रे झाली.

विशेष म्हणजे राज्यात डायलिसिसच्या बाबतीत बुलढाणा जिल्हा आघाडीवर आहे.डायलिसिस ही एक वैद्यकीय प्रक्रिया आहे, ज्यामध्ये मूत्रपिंड निकामी झाल्यावर रक्त कृत्रिम पद्धतीने शुद्ध केले जाते. किडनी पूर्णपणे किंवा अंशतः निकामी झाल्यावर शरीरातील विषारी घटक बाहेर टाकण्याचे कार्य थांबते. अशा वेळी रुग्णाचे रक्त शुद्ध करण्यासाठी डायलिसिस आवश्यक ठरते.

**जिल्ह्यात 'या' ठिकाणी मोफत डायलिसिस**

जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा, सामान्य रुग्णालय खामगाव, उपजिल्हा रुग्णालय शेगाव, उपजिल्हा रुग्णालय मलकापूर, ग्रामीण रुग्णालय चिखली, ग्रामीण रुग्णालय जळगाव जामोद, ग्रामीण रुग्णालय लोणार व वरवट बकाल येथे सध्या नियमितपणे ही सेवा सुरू आहे.

यापूर्वी जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन उपचार घ्यावे लागत होते. आता रुग्णांचा वेळ व खर्च वाचला आहे. शिवाय या योजनेमुळे जिल्ह्यातील अनेक किडनीग्रस्त रुग्णांना जीवनदान मिळाले आहे. योजनेला प्रतिसाद मिळत आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

रविवार, दि. १७ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# इतके वर्ष संसार करुन देखील संशयावरुन केली पत्नीची हत्या

प्रतिनिधी १७ मे

**अकोला :** अकोल्यातील डाबकी रोड पोलीस स्टेशन हद्दीतील जैन तेल केंद्र परिसरात घरगुती वादातून पत्नीची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मंगला गुडदे, वय ४० वर्षे, असे मृत महिलेचे नाव असून त्या रेणुका नगर परिसरात भाड्याने राहत होत्या. आज सकाळी पती दीपक गुडदे आणि मंगला यांच्यात पुन्हा एकदा किरकोळ कारणावरून वाद झाला. गेल्या दोन वर्षांपासून दोघांमध्ये सतत घरगुती वाद सुरू असल्याची माहिती स्थानिकांकडून समोर आली आहे. सकाळच्या वेळेत परिसरात अचानक गोंधळ उडाल्याने नागरिक घटनास्थळी धावले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. माहितीनुसार, मंगला गुडदे या सकाळी जवळच्या दुकानातून दुधाची पिशवी आणण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी पती दीपक गुडदे याच्यासोबत त्यांची शाब्दिक बाचाबाची झाली. या वादानंतर संतापाच्या भरात दीपक याने धारदार चाकूने पत्नीवर एकापाठोपाठ एक





वार केले. पोटावर आणि पाठीत गंभीर वार झाल्याने मंगला गुडदे या जागीच रक्ताच्या थारोळ्यात कोसळल्या. घटनेनंतर परिसरात एकच आक्रोश पसरला. विशेष म्हणजे मृत महिलेला एक मुलगा आणि एक मुलगी असून लवकरच मुलीचा विवाह करण्याचा कुटुंबाचा बेत होता. मात्र काळाने घाला घालत संपूर्ण कुटुंबावर

## मुलगा आणि मुलीचे काय चुकले

दु:खाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकही हळहळ व्यक्त करत आहेत. घटनेची माहिती स्थानिक नागरिकांनी तात्काळ डाबकी रोड पोलिसांना दिली. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि परिसराचा पंचनामा करण्यात आला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पाठवण्यात आला आहे. आरोपी पती दीपक गुडदे याला पोलिसांनी ताब्यात घेतलं असून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. डाबकी रोड पोलीस स्टेशनचे ठाणेदार दीपक कोळी यांनी माध्यमांना घटनेची माहिती दिली. प्राथमिक तपासात ही हत्या घरगुती वादातून झाल्याचे समोर येत असून पोलीस अधिक तपास करत आहेत. अकोल्यातील या घटनेमुळे पुन्हा एकदा कौटुंबिक हिंसाचाराचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# अतिरिक्त शिक्षकांच्या समस्येवर निघाला तोडगा!

प्रतिनिधी १७ मे

♦ शिक्षक संघटना- आयुक्तांच्या बैठकीत निर्णय

**अकोला :** ऑनलाइन संच मान्यतेच्या घातक निकषाच्या आधारे शिक्षक अतिरिक्त करण्याचा घाट प्रशासनाने घातला असल्याचा आरोप विज्युक्टा व राज्य महासंघाने केला असून, याबाबत आयुक्तांशी झालेल्या बैठकीत चर्चाही करण्यात आली. त्यानंतर आता संचमान्यतेसाठी प्रचलीत निकषांचा विचार होणार आहे. त्यामुळे आता अतिरिक्त शिक्षकांच्या समस्येवर तोडगा निघाला आहे.

गतवर्षी संचमान्यतेचे (संचमान्यता म्हणजे विद्यार्थी संख्येनुसार शाळेत किती शिक्षक असावे त्यानुसार शिक्षक पदांची मंजुरी) सुधारित निकष शासनाने जारी केल्यानंतर प्रक्रिया नवीन निकषानुसार सुरु झाली. मात्र या निर्णयानुसार यावर्षी केलेल्या संचमान्यतेमुळे शिक्षक अतिरिक्त होण्याची भीती निर्माण झाली.



दररम्यान ऑनलाइन संच मान्यतेचा मुद्दा ऐरणीवर आला असून, विज्युक्टा व राज्य महासंघाने शिक्षण आयुक्त कार्यालयावर केलेल्या आंदोलनात अकोल्यातील पदाधिकारी सहभागी झाले. मोर्चाला प्रशासनाने ऐनवेळी अनुमती नाकारल्याने विज्युक्टा व राज्य महासंघाने शिक्षण आयुक्त कार्यालयावर धरणे आंदोलन केले. या आंदोलनाला आमदार सत्यजित तांबे, आ. आसगावकर, प्रा. मुकुंद आंधळकर, महासंघाचे अध्यक्ष प्रा. संजय शिंदे, विज्युक्टाचे अध्यक्ष डॉ. अविनाश बोर्डे (अकोला), डॉ. अशोक गव्हाणकर, प्रा. संतोष फाजगे आदींनी संबोधित केले. आंदोलनात महासंघ प्रतिनिधी प्रा.भाऊ गोरे, डॉ. अभिजित पोटले, डॉ. चेतन हिंगणेकर, प्रा. गजानन धांडे, प्रा. विजय कुत्तरमारे, डॉ. प्रविण चटप आदींसह हजारो शिक्षक सहभागी झाले होते.

### अनुदानित शिक्षण व्यवस्था संपविण्याचा घाट

♦ऑनलाइन संचमान्यतेच्या आड अनुदानित शिक्षण व्यवस्था संपवण्याचा घाट शासन आणि प्रशासनाने घातला आहे. यापूर्वी प्राथमिक व माध्यमिक शाळेला १५ मार्च २०२४ च्या संच मान्यतेच्या घातक निकषाने सुमारे आठ हजार शाळा बंद करण्याचा निर्णय केला जात आहे. हजारो शिक्षक राज्यात अतिरिक्त करण्याचे धोरण राबवले जात आहे, असे विजुक्टाचे म्हणणे आहे.

♦प्रचलित निकषांना अनुलक्षुण ऑनलाइन संच मान्यता करण्यातबाबत संघटनेने बैठकीत स्पष्ट भूमिका घेतली. त्याला सकारात्मक प्रतिसाद शिक्षण आयुक्तांनी यांनी दिला. अनुकंपा तत्त्वावरील नियुक्ती बाबत शैक्षणिक अहर्ता घेण्यास काही कालावधी देण्याबाबत सहमती दर्शवण्यात आली.

**प्रा. अविनाश बोर्डे,**
जिल्हाध्यक्ष, विज्युक्टा अकोला


# लिंबाच्या दराने गाठला नवा उच्चांक

♦ बाजारपेठेत लिंबू १२० ते १४० रुपये प्रति किलो

प्रतिनिधी १७ मे

**अकोला :** अवकाळी पाऊस तसेच गारपिट मुळे जिल्ह्यातील फळबाग तसेच लिंबू लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते, त्यातच बाजारपेठेत लिंबूची आवक कमी झाल्याने लिंबू दराने नवा उच्चांक गाठला असून नागरिकांच्या खिशाला कात्री बसत आहे.

अकोला बाजारपेठेत लिंबाच्या दराने आज नवीन उचांक गाठला. बाजारपेठेत ९० ते ११० रुपये प्रति किलो मिळणारे लिंबू आता १२० ते १४० रुपये प्रति किलो पर्यंत पोहोचल्याने सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला कात्री बसत आहे. उन्हाचा पारा अकोला जिल्ह्यात ४६ डिग्री सेल्सिअसवर पोहोचला असून



रखरखत्या उन्हात लिंबाच्या किमतीत वाढ झाल्यामुळे लिंबू सरबत सुद्धा महागले आहे. काही दिवसांपूर्वी अकोला जिल्ह्यात गारपीट तसेच अवकाळी पावसामुळे भाजीपाला, फळबाग तसेच लिंबू बागांचे मोठे नुकसान झाले होते, त्यातच बाजारपेठ मध्ये लिंबांची मागणी सुद्धा वाढल्याने भावात वाढल्याचे सांगण्यात येत आहे. अकोला बाजारपेठ तसेच किरकोळ भाजी विक्रेत्यांकडे प्रति लिंबू चार ते पाच रुपये नागरिकांना द्यावे लागत आहे.

# घराच्या प्रवेश द्वारावरच अघोरी कृत्य

♦ लिंबू, कुंकु, टाचण्या टाकून भयभीत करण्याचा प्रयत्न

प्रतिनिधी १७ मे

**कुटासा :** ग्राम बळेगाव येथील सुरेश रामदास ठोकळ यांच्या नवीन घराच्या बांधकामावर जादूटोणा करण्याचा प्रयत्न झाल्याची



घटना समोर आली आहे. घराच्या प्रवेशद्वाराजवळ लिंबू, कुंकू, हळद तसेच टाचण्या व काळ्या अगरबत्त्यांचा वापर करून संशयास्पद प्रकार करण्यात आल्याचे दिसून आले. या घटनेमुळे बळेगाव परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, गावात विविध चर्चांना उधाण आले आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी हे अघोरी कुत्य पाहण्यासाठी परिसरात गर्दी केली. संबंधित प्रकाराबाबत चौकशी सुरू असून, नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# 'नीट' परीक्षेमुळे 'टीईटी'च्या तारखेत बदल!

प्रतिनिधी १७ मे

**आता २१ ऐवजी २८ जून रोजी होणार परीक्षा**
**परिषदेच्या संकेतस्थळावर प्रवेशपत्र उपलब्ध**

**अमरावती :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत रविवार, २१ जून रोजी आयोजित करण्यात आलेली 'महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) - २०२६' आता २८ जून रोजी घेतली जाणार आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीमार्फत याच दिवशी देशभरात 'नीट' परीक्षेचे आयोजन करण्यात आले असून दोन्ही परीक्षांसाठी अनेक केंद्रे सामायिक आहेत. ही परीक्षा सुरळीत पार पडावी आणि परीक्षार्थींची गैरसोय टाळावी, या उद्देशाने परिषदेने हा महत्त्वपूर्ण बदल केला आहे, असे




परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

सुधारित वेळापत्रकानुसार, २८ जून रोजी टीईटी परिक्षेचा, पेपर १ सकाळी १०:३० ते दुपारी १:०० या वेळेत, तर पेपर २ दुपारी २:३० ते सायंकाळी ५:०० या वेळेत पार पडेल. उमेदवारांना १६ जून ते २८ जून २०२६ या कालावधीत परिषदेच्या संकेतस्थळावरून आपली प्रवेशपत्रे ऑनलाईन डाऊनलोड करता येतील. प्रशासकीय कारणास्तव वेळापत्रकात बदल झाल्यास त्याची माहिती अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल, असेही महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेद्वारे कळविण्यात आले आहे.






# संस्कृती रक्षणासाठी संस्कृतचे ज्ञान गरजेचे : आ. डॉ.कुटे




प्रतिनिधी १७ मे

**अकोट :** आयुर्वेदाचे संपूर्ण तत्त्वज्ञान संस्कृत भाषेमध्ये असून, मी आयुर्वेदातूनच डॉक्टर झालो असल्यामुळे मला संस्कृत भाषा कळते आणि आवडते सुद्धा. भारतीय संस्कृती टिकून राहावी असे वाटत असेल तर, संस्कृत भाषा शिकण्याला पर्याय नाही.बालसंस्कार शिबिराच्या माध्यमातून ही भाषा शिकवून अप्रत्यक्षरीत्या संस्कृती संवर्धनाचे काम होत असल्याचे प्रतिपादन आ. डॉ. संजय कुटे यांनी केले. ते संत वासुदेवजी महाराज स्मृती मंदिर श्री ज्ञानेश आश्रम वारी भैरवगढच्या वतीने आयोजित श्री माऊली सर्वांगीण विकास बालसंस्कार शिबिरातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना बोलत होते. यावेळी प्रकाश वाघ , काळे, डॉ. सुहास कुलट, सुरेशभाई शेजपाल आदिंचा संस्थेच्या वतीने शाल तथा श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

# ज्येष्ठ अधिक मास आजपासून सुरू



♦ या महिन्यात दानाचे विशेष महत्त्व



प्रतिनिधी १७ मे

**अकोला :** ज्येष्ठ अधिक मासात (पुरुषोत्तम मास) दान करण्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या काळात केलेले दान सर्व पापांचे निवारण करते आणि अक्षय पुण्य प्रदान करते. भगवान विष्णू आणि श्रीकृष्ण यांना समर्पित या महिन्यात दान केल्याने ऐहिक सुख आणि मोक्ष प्राप्त होतो, अशी श्रद्धा आहे.

या महिन्यात पूजेचे आणि दानाचे साहित्य ३३ च्या संख्येने देण्याची परंपरा आहे. यामध्ये ३३ अनारसे, दिवे (दीपदान) किंवा अनारसे दान केले जातात.

शहरातील दुकानात दानाचे साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. ज्येष्ठ महिन्यात येणाऱ्या या अधिक मासात जावयाला मानपान देणे आणि त्याला 'वाण' (भोजन व भेटवस्तू) देण्याचे मोठे महत्त्व आहे. या महिन्यात तीव्र उष्णता असल्यामुळे वाटसरूंना थंड पाणी देणे (पाणपोई), सरबत वाटप करणे, फळे आणि धान्याचे दान करणे खूप पुण्यदायी मानले जाते. मंदिरात किंवा नदीकाठी तुपाचा दिवा लावण्याने घरातील दुःख दूर होते आणि जीवनात सुख-समृद्धी येते. या पवित्र महिन्यामध्ये दान केल्याने जीवनात सकारात्मकता येते.

# महापौर शारदा खेडकर यांनी केली महान धरण व जलशुध्दी केंद्राची पाहणी

प्रतिनिधी १७ मे

**अकोला :** १६ मे रोजी महापौर सौ. शारदा रणजीत खेडकर यांनी सभागृह नेता पवन महल्ले यांच्या समवेत अकोला महानगरपालिकेचे जलशुद्धीकरण केंद्र, महान तसेच महान धरण येथे पाहणी केली. या पाहणी दरम्यान महान धरणात उपलब्ध पाणीसाठी तसेच जलशुध्दीकरण केंद्र येथे शुध्दीकरणाच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करून संपुर्ण कामाबाबतची माहिती घेतली असून महान धरणात उपलब्ध उपयुक्त पाणीसाठा २५.४४८ द.ल.घ मी. असून



नुसार शहरातील पाणीपुरवठ्याचे नियोजन काटेकोरपणे व्यवस्थित करणे बाबत निर्देश दिले. तसेच पाहणी दरम्यान पाण्याचे गुणवत्तेबाबत समाधान व्यक्त केले. पाण्याची गुणवत्ता कायम रहावी याबाबत सतत प्रयत्नशील राहावे असे याबाबत संबंधीत कर्मचा-यांना यावेळी महापौर यांनी सुचना केल्या. तसेच पाईपलाईन वरील उद्धवलेले लिकेज तातडीने दुरुस्त करण्याबाबत निर्देश दिले. शहरातील नागरिकांनी उन्हाळ्याची तीव्रता पाहता व धरणातील पाण्याचे बाष्पीभवन जलद गतीने होत असल्याने पुरेशी साठवणूक करून पिण्याच्या पाण्याचा आवश्यक वापर करून अपव्यय टाळावा असे आवाहन महापौर सौ.शारदा रणजीत खेडकर यांनी यावेळी केले आहे. यावेळी पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल डोईफोडे, उपअभियंता नरेश बावणे, कनिष्ठ अभियंता आशिष भालेराव यांचे समवेत जलशुद्धीकरण केंद्रावरील पंप ऑपरेटर, फिल्टर ऑपरेटर व जलसेवक यांची उपस्थिती होती.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135